आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI No. MAHBIL/2011/39044

वर्ष १२ | अंक ०७| ऑक्टोबर २०२३ | मूल्य रु. ५/-

# Grahak Tituka Melwawa

# ग्राहक तितुका मेळवावा

मुंबई ग्राहक पंचायत

ग्राहक हिताय
ग्राहक सुखाय

Consumers International
Member of Consumers International

## पंचायत पेठ विशेषांक

शुभ दीपावली

## सेतू बांधा रे













# बहरला पंचायत पेठांचा मौसम

**– शिरीष देशपांडे,** *कार्याध्यक्ष*

**मुं**बई ग्राहक पंचायतीच्या 'ग्राहक पंचायत पेठा' या गेल्या काही वर्षांत ऑन–लाईन शॉपिंगच्या जबरदस्त आव्हानाला यशस्वीपणे तोंड देत बहरताना मी बघतोय. पंचायत पेठांचा हा बहरलेला मोहोर पाहून आमच्या सर्व कार्यकर्त्यांचे कौतुक, गाळेधारकांचे अभिनंदन आणि समस्त ग्राहक बंधु भगिनींचे आभार मानण्यासाठी आता कोणत्या शब्दांची पखरण करायची असा गोड प्रश्न माझ्या मनात रुंजी घालतोय.

गेल्या दोन–तीन वर्षांत ऑन–लाईन शॉपिंग मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय होऊ लागले. त्यामुळे आता लोक थोडे कष्ट सहन करून प्रत्यक्ष खरेदीला घराबाहेर पडतील का, पंचायत पेठांकडे फिरकतील का अशी एक साधारण भीती मनात होती. परंतु करोना काळातील सक्तीच्या विश्रांती नंतर आपल्या ग्राहक पंचायत पेठांनी पुन्हा एकदा जी भरारी घेतली आहे ती सर्वार्थाने लक्षणीय आहे. त्यामागे आहे नाविन्याचा सतत ध्यास घेऊन त्याला प्रचंड मेहनतीची जोड देणारी आपली पंचायत पेठ समिती. वर्षांत अकरा, बारा पेठांचे आयोजन म्हणजे संपूर्ण वर्षाचे काम. पेठ समितीच्या सर्व कार्यकर्त्या हे काम अगदी मनापासून आणि आनंदाने करताना मी स्वतः ग्राहक भवनात बारा महिने बघतोय. त्यामुळे या सर्व कार्यकर्त्यांचे कौतुक करताना शब्द अपुरे पडतात.

पंचायत पेठ हे आता असं एक व्यासपीठ झालंय की वितरणापासून ग्राहक शिक्षण, संरक्षण, पर्यावरण, संघटन अशा संस्थेच्या सर्व कार्याची झलक आपल्याला आपल्या कोणत्याही पंचायत पेठेत पहायला मिळते. त्यामुळे पंचायत पेठा या मुंबई ग्राहक पंचायतीचे एक सुरेख मिनिएचरच होऊन बसले आहे.

दादरला दि. ३० सप्टेंबर पासून आपल्या पंचायत पेठांचा तिसरा टप्पा सुरू होत आहे. दादर पाठोपाठ ठाणे, अंधेरी, वसई आणि बोरीवली अशी पाच पंचायत पेठांची ही मालिका असणार आहे. ही मालिका सुध्दा फार मोठ्या प्रमाणावर यशस्वी होईल याची मला खात्री आहे. त्यासाठी सर्व गाळेधारकांना आणि कार्यकर्त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा.

पंचायत पेठ समितीने या वर्षी आणखी एक सामाजिक उपक्रम हाती घेतला आहे. **दि. १७ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर २०२३** या काळात अंधेरी येथे भरणाऱ्या पेठेदरम्यान **दि. २० ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर २०२३** या काळात **'सेतू बांधा रे'** ही एक आगळी वेगळी पंचायत पेठ आयोजित करत आहोत. या पेठेत समाजातील वंचित, बाधित, अंध आणि आदिवासी वर्गातील लोकांनी निर्माण केलेल्या आकर्षक वस्तूंची ही एक विशेष पेठ असणार आहे. यातील सर्व गाळे आपण अशा सामाजिक संस्थांना दिलेले आहेत की जे अशा वंचित वर्गाकडून काही वस्तुंची निर्मिती करून घेत असतात. पण या संस्थांनी निर्मिती केलेल्या वस्तूंना बाजारपेठ कोण उपलब्ध करून देणार? नेमके हेच काम मुंबई ग्राहक पंचायत करणार आहे. आपण अशा या सामाजिक संस्थांना या तीन दिवसांसाठी गाळे पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देत आहोत. तसेच आपला ग्राहक वर्ग देखील उपलब्ध करून देत आहोत. माझे समस्त ग्राहक वर्गाला आवाहन आहे की त्यांनी **'सेतू बांधा रे'** या विशेष ग्राहक पंचायत पेठेला आवर्जून उपस्थित राहून आणि मोठी खरेदी करून या सामाजिक संस्थांना आणि पर्यायाने त्या ज्या दुर्बल, वंचित वर्गासाठी राबत आहेत त्यांना सक्षम करून त्या सर्वांच्या घरी दिवाळी साजरी करण्यास हातभार लावावा.

माझ्या सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून कौतुक करतानाच समस्त ग्राहक वर्गाला पंचायत पेठांचे निमंत्रण सुध्दा देत आहे. या, भरपूर खरेदी करा, जागरूकपणे खरेदी करा आणि खरेदीचा हा उत्सव आनंदात साजरा करा.

**दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा**

**पंचायत पेठ वेळापत्रक – २०२३–२४**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ३० सप्टेंबर ते ०८ ऑक्टोबर २०२३ | सूर्यवंशी हॉल, शिवाजी पार्क, दादर (प.) | ९ दिवस |
| २ | ०९ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर २०२३ | कांती विसारिया हॉल, नौपाडा, ठाणे (प.) | ८ दिवस |
| ३ | १७ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर २०२३ | सिंफनी बँक्वेट, सहार रोड, अंधेरी (पू.) | ६ दिवस |
| ४ | २३ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२३ | गणपतराव वर्तक हॉल, पारनाका, वसई (प.) | ७ दिवस |
| ५ | ३० ऑक्टोबर ते ०७ नोव्हेंबर २०२३ | भाटियावाडी हॉल, बाभई, बोरीवली (प.) | ९ दिवस |

## मुंबई ग्राहक पंचायत

**विश्वस्त मंडळ**
डॉ. बाळ फोंडके
अनुराधा गोरे
ललिता कुलकर्णी
अनुराधा नरसाळे
संजीव मंत्री

**अध्यक्ष**
डॉ. बाळ फोंडके

**उपाध्यक्ष**
अनुराधा गोरे

**कार्यकारी मंडळ**
ॲड. शिरीष देशपांडे (कार्याध्यक्ष, स्वीकृत)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह)
ज्योती मोडक (कार्यवाह)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

**सभासद**
छाया वारंगे, शीला देवळेकर,
राजेंद्र राणे, शुभदा चौकर,
मंगला गाडगीळ, अनघा आचरेकर,
विवेक केळकर, शर्मिला रानडे,
आलोक हर्डीकर (स्वीकृत),
अभय जोशी, पराग रेडकर,
अर्चना पानगांवकर (स्वीकृत),
प्रकाश पाटील, उदय पिंगळे (स्वीकृत)

**निमंत्रित**
• *संघटन विभाग प्रमुख*

**पंचायत पेठ समिती**
अनुराधा देशपांडे (अध्यक्ष)

**सदस्य**
अनघा आचरेकर, अलका मोकाशी
शुचिता पाटणकर, अंजली बापट
प्रिती कोळमकर, उमा अभ्यंकर
उल्का पाटील, राजेंद्र राणे

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक/
संघटना सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका

ग्राहक तितुका मेळवावा
१ ऑक्टोबर २०२३
भाद्रपद/आश्विन १९४५

बहरला पंचायत पेठांचा मौसम................ २
संपादकीय.................................. ४
वाचू आनंदे ................................ ५
'सेतू बांधा रे' ............................... ६
चेंबूर येथे पहिल्यांदाच
पंचायत पेठेचे पदार्पण ..................... ११
पंचायत पेठ- दृष्टिक्षेप .................... १२
ग्राहक पंचायत पेठः दालन-तक्ता ........... १६
ASCI अकेडमीमध्ये मुंबई ग्राहक
पंचायतीचा सहभाग ........................ २०
उत्सव पंचायत पेठांचा...................... २१
चोळी ते ब्लाऊज - नवा लूक! ........... २२
ब्लाऊज आणि टॅकटॉप..................... २४
'One Station One Product'
उपक्रम बोरिवलीत संपन्न.................... २५
MGP's appeal to CM... ........................ २६



**वार्षिक सभेला नक्की या!**

मुंबई ग्राहक पंचायतीच्या सभासदांची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळ फोंडके यांच्या अध्यक्षतेखाली रविवार, दि. ८ ऑक्टोबर २०२३ रोजी, दुपारी ३.०० वा. ग्राहक भवन येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती

❖ संपादक :- शुभदा चौकर
❖ संपादकीय साहाय्य :- अनुराधा देशपांडे, नेहा जोशी, सुमिता चितळे, शर्मिला नाईक
❖ सल्लागार :- ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर
❖ मुखपृष्ठ :- राजेंद्र राणे
❖ अक्षरजुळणी व रचना, कला व मुद्रण :- इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई

Printed & Published by **NISHIKANT VINAYAK GURJAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat,** Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031 and Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg, JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai - 400 056 Ph.: 26288624, 26281832, Fax : 26250916. • Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in • Website: **https//www.mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

संपादकीय

# एक पणती, त्यांच्याही दारात



गेली ४६ वर्षे अव्याहतपणे चालणारा आपल्या ग्राहक पंचायत पेठेचा हा वृक्ष आता छान डेरेदार झालाय. वर्षाचे जवळजवळ ११ महिने बहरणारा हा वृक्ष अनेक छोट्या मोठ्या उत्पादकांचा आधारवड ठरला. ह्यांतील सुरुवातीची काही वर्षे सोडली तर जवळजवळ १७ वर्षे ह्या पंचायत पेठांची जबाबदारी सांभाळत असताना सतत काहीतरी नवनवीन सुचत गेले. नवीन कल्पना आकारत येत राहिल्या. **'सेतू बांधा रे!'** ही ह्यावर्षी आयोजित होणारी विशेष पेठ अशीच सुचलेली कल्पना. गेली काही वर्षे हा उपक्रम आयोजित करताना आणि त्यानंतर तो सुफळ संपन्न झालेला बघतांना खूप छान वाटायचं. पण तरीही कुठेतरी एका कोपऱ्यात त्याला हुरहूर वाटणारी झालरसुध्दा असायची.

आपल्या ह्या पंचायत पेठांमध्ये गेली काही वर्षे जाणिवपूर्वक समाजातील वंचित घटकांसाठी धडपडणाऱ्या सामाजिक संस्थांना विनामूल्य स्टॉल देत आलोय. बाबा आमटेंचा आनंदवन किंवा नेरे येथील कुष्ठरोग्यांचा शांतीवन ही काही उदाहरण. तरीही एकंदर स्टॉलच्या तुलनेत हे प्रमाण अगदीच नगण्य.

पण एक घटना अशी घडली की एके वर्षी अशाच एका संस्थेकडून ह्या पेठा झाल्यावर धन्यवाद देणारे पत्र आले. आदिवासींसाठी काम करणाऱ्या एका संस्थेला आपण स्टॉल दिला होता. त्यांनी निर्माण केलेल्या बांबूपासूनच्या वस्तूंची विक्री जवळजवळ २ लाखाच्या वर झाली होती. उलाढालीचा एवढा उच्चांक ह्या संस्थेने केवळ १० दिवसात कधीच अनुभवला नव्हता. त्यांनी पत्रात लिहिलं होतं आज प्रथमच आमच्या आदिवासींच्या घरात खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी होतेय. पत्र वाचलं आणि प्रकर्षाने जाणवलं की अशा अनेक संस्था कुठेतरी प्रकाशाचे कवडसे शोधताहेत. त्यांना, त्यांच्या संस्थेतील मुलांनी निर्मिती केलेल्या उत्पादनांना व्यासपीठच नाही. त्याला ग्राहकच नाही मग कशी पोहोचणार ही मंडळी समाजापर्यंत?



आपण एका सुरक्षित कवचात राहतो. आपल्या समस्या वेगळ्या, नाही म्हटल्यातरी थोड्या पांढरपेशा म्हणाव्यात अशा. पण अंध, मतिमंद, अपंग, कर्णबधीर आणि पार डोंगरदऱ्यात राहणारा, शिक्षणाचे वारेही तिथपर्यंत पोहोचू शकत नाही अशा अनेक वंचित घटकांसाठी काम करणारी अनेक मंडळी आहेत. अनेक संस्था आहेत त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी धडपडणाऱ्या. ह्या वर्गाला सक्षम करण्याची त्यांची प्रामाणिक धडपड आहे. अशा वर्गाकडून त्यांच्या क्षमतेनुसार काही उत्पादनांची निर्मिती करून घेताहेत. पण हे सर्व आपल्यापर्यंत पोहोचणार कसे? त्यासाठीच हा 'साकव' **'सेतू बांधा रे!'** चा. ह्या संस्थांना समाजाकडून दया नकोय. त्यांना हवाय मदतीचा भक्कम हात. सक्षम होण्यासाठी आणि सक्षम करण्यासाठी ह्या प्रकल्पाची साद घातली आणि अशा अनेक संस्थांनी आपल्याशी संपर्क साधला. अगदी पार पुणे, नाशिक, पालघर, जळगाव, उस्मानाबाद येथील संस्थाही संपर्कात आल्या. पाड्यावरचा आदिवासी समाज, रेल्वे स्टेशनवर सोडून दिलेल्या मतिमंद मुलांचे पुनर्वसन करण्यासाठी धडपडणारी, कुठे कचरा, भंगार वेचक मुलांना शिक्षणाची गोडी लावू पाहणारी अशा विविध संस्था पुढे आल्या आहेत. त्यांच्या एकेक कहाण्या आपल्याला अस्वस्थ करतात, अंतर्मुख करतात.

ही मंडळी आपआपली उत्पादने घेऊन आपल्या ह्या विशेष पेठेत सहभागी होतील. बांबूपासून बनविलेले कंदील, विविध प्रकारच्या पिशव्या, पेंटींग्ज, पणत्या, बांबू पासूनच्या कलात्मक वस्तू खूप काही इथे बघायला आणि खरेदी करण्यासाठी असेल. ग्रिटींग कार्ड, पाकिटे, गोधड्या, एप्रन्स आणि बरेच काही.

यंदा दिवाळीत भेट देण्यासाठीच्या वस्तू आपण सर्वजण इथेच खरेदी करणार आहोत. किंबहुना असा निश्चयच करूया. केवळ आपणच नाही तर आपले नातेवाईक, आसपासचे

आमंत्रण, सखे सर्वांनाच आपण ह्या पेठेला येण्यासाठी निमंत्रित करत आहोत. आपल्या प्रत्येक खरेदीने त्यांच्या दारात दिवाळीची एकेक पणती तेवणार आहे.

अंधेरी येथे १७ ते २२ ऑक्टोबर ह्या कालावधीत सिंफनी बँक्वेट हॉल, अंधेरी, ३ रा मजला येथे आपली नेहमीची पेठ संपन्न होत आहे. ह्याच कालावधीदरम्यान २० ते २२ आक्टोबर २०२३ या तीन दिवशी ह्या सिंफनी बँक्वेट हॉल मधेच ह्या विशेष पेठेचे आयोजन करण्यात आले आहे. 'आहे रे' कडून 'नाही रे' कडे जाण्याचा आपला हा पहिलाच प्रयत्न अतिशय छोटासा आहे. पण तो आपल्या सर्वांच्या सहकार्याने नक्कीच यशस्वी होईल ह्याची खात्री आहे.

ग्राहक कसा असावा? ग्राहक सजग, सुजाण, सुदृढ, सुसंस्कृत आणि संवेदनशील असावा, ह्या पाच स ने होणारी ग्राहकत्वाच्या व्याख्येतील संवेदनशीलता महत्त्वाची. ह्या वंचित वर्गाप्रति संवेदनशीलतेतून हे विशेष पेठेचे आयोजन होतेय.

ह्या निमित्ताने आठवते ती कवीवर्य दत्ता हलसगीकरांची कविता:

**ज्याची बाग फुलूनी आली**  
**त्यांनी दोन फुले द्यावीत**  
**ज्यांचे सूर जुळून आले**  
**त्यांनी दोन गाणी द्यावीत**  
**आभाळा एवढी ज्यांची उंची**  
**त्यांनी थोडे खाली यावे**  
**मातीत ज्यांचे जन्म मळले**  
**त्यांना खांद्यावरती घ्यावे**

**– अनुराधा देशपांडे**


---

वाचू आनंदे

**डिसेंबर २०२३ च्या वाटपातील पुस्तक**

- ***अन्नगाथा;*** *लेखिका :* डॉ. मृणाल पेडणेकर; *प्रकाशक :* सकाळ प्रकाशन; *छापील किंमत :* ₹ १४०/–; *वाटपातील किंमत :* ₹ १०२/–

# अन्नगाथा




**म**राठी विज्ञान परिषदेतर्फे ई–बुक स्वरूपात प्रसिध्द झालेल्या सदर पुस्तकाची छापील प्रत संग्राह्य आहे. आपल्या शरीराला असणारी विविध अन्नघटकांची गरज आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध या पुस्तकात समजवून सांगितला आहे. लेखिकेची वैज्ञानिक दृष्टी, अभ्यास आणि भाभा अणुसंशोधन केंद्रातील अन्न – तंत्रज्ञान विभागातील संशोधनाचा अनुभव, यांमुळे माहितीला भक्कम शास्त्रीय आधार प्राप्त झाला आहे.

'सजीव सृष्टी ही आहाराच्या दृष्टीने प्रामुख्याने दोन गटात विभागता येते. एक म्हणजे निर्माता आणि दुसरा गट उपभोक्ता.' असे सुरुवातीच्या प्रकरणात स्पष्ट केले आहे. अन्न मिळण्याबाबत मनुष्य परावलंबी आहे आणि म्हणून 'मानवाला उपलब्ध असलेलं अन्न साठवून आणि टिकवून ठेवण्याची आवश्यकता भासते.'

शरीराच्या जडणघडणीसाठी, रोग प्रतिकारासाठी आणि शरीर नामक यंत्राचे चक्क इंधन म्हणून विविध अन्न घटकांचे प्रमाणशीर सेवन किती आवश्यक आहे, हे सहज समजेल, अशी मांडणी आहे. पदार्थाला पीठ लावले की तो मिळून येतो तो का? नीट न शिजलेली डाळ थंड झाली की परत कुकरमध्ये ठेवून शिजवायचा प्रयत्न केला तरी शिजत नाही, ते का? आपले शरीर मोड आलेल्या धान्यातील अन्न घटकांचे शोषण सहजतेने करू शकते, ते का? आपल्याला पडायला हवेत पण जे पडत नाहीत, अशा अनेक प्रश्नांची जाणीव होणे आणि उत्तरे मिळणे, हे दोन्ही एकाचवेळी घडू शकते.

तयार अन्न किंवा अन्न घटक, धान्ये, भाज्या, फळे हे सगळे साठवणे आणि टिकवणे यासाठी प्राचीन काळापासून ते आजतागायत माणूस प्रयोग तसेच अभ्यास करीत आला आहे. त्या साठवणुकीच्या विविध पध्दतीची ओळख हे या पुस्तकाचे अजून एक वैशिष्ट्य! ही सगळी माहिती मुळातून वाचली की आपल्या मनातील गैरसमज दूर होऊन, समाज माध्यमातील अन्न विषयक विविध अनाहूत सल्ले चुकीचे/बरोबर असतात, हेही लक्षात येईल.

**– वसुंधरा देवधर**



# सेतू बांधा रे

**– संकलन : अनुराधा देशपांडे, नेहा जोशी**

**साकव म्हणा, पूल म्हणा किंवा सेतू म्हणा शेवटी त्याचे काम एकच, दोन किनारे जोडणे, दोन बिंदू जोडणे, नदीचे दोन तीर जोडणारा 'साकव' प्रभू रामचंद्रांनी लंकेत जाण्यासाठी वानर सेनेच्या मदतीने बांधलेला सेतू रामाचा सेतू. आपलाही हा असाच प्रयत्न 'आहे रे कडून नाही रे कडे जाणारा'.**

**'सेतू बांधा रे' ची साद घातली आणि अनेक मुंबई आणि मुंबई बाहेरच्या संस्थांनी प्रतिसाद दिला. आपण करत असलेल्या कार्याची आणि त्यांच्या उत्पादनांची थोडक्यात सचित्र माहिती कळविली. आमच्या वाचकांपर्यंत हे सगळे पोहोचविण्याचा थोडक्यात प्रयत्न.**

**खरे तर आपण सर्वांनी या विशेष पेठेला आणि तेथील प्रत्येक स्टॉलला प्रत्यक्ष भेट दिलीच पाहिजे. बघूया, ऐकूया आणि खरेदी करूया. अशा संस्थांना हातभार लावण्याच्या दिशेने हातात हात घालून एकेक पाऊल पुढे टाकूया.**

## घरकुल परिवार, नाशिक



नाशिक येथे मतिमंद मुलींच्या पुनर्वसनासाठी कार्यरत असलेली ही संस्था विशेषत्व लाभलेल्या मुलींना/महिलांना त्यांच्या घरानंतर दुसरे सुरक्षित घर उपलब्ध करून देण्याच्या हेतूने २००६ साली सुरू करण्यात आली. 'घरकुल' संस्था Home away from Home या संकल्पनेवर आधारित आहे. 'घरकुल' ह्या विद्यार्थिनींना त्यांच्या शारीरिक, मानसिक क्षमतेप्रमाणे व्यावसायिक शिक्षण देऊन आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न करते. प्रशिक्षण घेतलेल्या ह्या मुली सुंदर अशा कलावस्तू बनवतात. वेगवेगळ्या आकाराचे सुबक कापडी आकाश कंदील, कापडी तोरणे तसेच लाकडी ट्रे, सजवलेल्या मातीचे कप (कुल्हड), कापडी पिशव्या/पर्सेस, कापडी वॉल हॅगिंग्ज अशा अनेकविध वस्तू 'घरकुल'च्या विद्यार्थिनी बनवतात. पुणे, मुंबई, गडचिरोली, चंद्रपूर इथून आलेल्या जवळजवळ ६० मुली सध्या संस्थेत आहेत.


## सोबती पेरेन्टस् असोसिएशन



ठाणे स्थित असलेली ही संस्था अंध, अटॉस्टिक, मतिमंद, मूक-बधिर मुलांच्या पालकांनी एकत्र येऊन २००४ साली स्थापन केली. ह्या विशेष मुलांना तसेच त्यांच्या पालकांनाही मूळ प्रवाहात आणण्यासाठी ही संस्था प्रयत्न करते. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी ही मुले मोत्यांचे-मण्यांचे दागिने, तोरणे तसेच रंगीत पणत्या, ग्रीटींग कार्ड, दिवे बनवितात. संस्थेचे उद्दिष्ट अशा विशेष मुलांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे. त्यांच्या क्षमतेनुसार त्यांच्यातील कौशल्य हेरून काम करून घेतले जाते. त्यात पालकांचा सहभाग मोठा. समाजानेही अशा संस्थांना मदत करणे आवश्यक आहे. किंबहुना आपणा सर्वांचेच ते नैतिक कर्तव्य ठरते.

## स्वयंसिध्दा, कोल्हापूर

'स्वयंसिध्दा' तळागाळातीलही महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने स्थापित झालेली कोल्हापूर येथील संस्था. महिलांनी स्वावलंबी, आत्मनिर्भर असावे ह्यासाठी अनेक शिबिरे,



कार्यशाळा संस्था आयोजित करते. शैक्षणिकदृष्ट्या कमी गती असणाऱ्या, शाळेत नापास झालेल्या मुलींसाठी शाळेत १९९७ साली 'स्वयंसिध्दा' या कोल्हापूर संस्थेने शाळा सुरू केली. अनौपचारिक शिक्षणाचा हा प्रयोग बऱ्यापैकी यशस्वी झाला. जवळजवळ इथे शिकलेल्या ४२० मुली कमावत्या झाल्या. शिक्षणात गती नाही

म्हणून शाळा सोडलेल्या मुलींसाठी ह्या संस्थेने शैक्षणिक अभ्यासक्रमही बदलला.

हेतू हाच की येनकेन प्रकारे ह्या मुलींनी आत्मनिर्भर व्हावे. आता अशा महिला, मुली ह्या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित होतात. मुलींसाठी कार्यशाळा आयोजित केल्या जातात. त्यातून त्यांना रोजगार प्राप्त होतो. सध्या फॅशनमध्ये ज्याचा बोलबाला आहे असे **सुबक फॅब्रिक दागिने**, खणाच्या कापडापासून बनविलेल्या अनेकविध वस्तू उदा. पर्सेस, नथ पर्सेस, बटवे तसेच पेपर क्विलिंगच्या शोभिवंत वस्तू 'स्वयंसिध्दा'च्या महिला बनवितात. त्यातून त्यांना रोजगार प्राप्त होतो. आर्थिक स्वावलंबन प्राप्त होते.

## गोंड आदिवासी महिला विकास प्रकल्प, निसर्गवेध ट्रस्ट



भंडारा जिल्ह्यातील गोंड आदिवासींच्या पुनर्वसनासाठी निसर्गवेध ट्रस्ट पिटेझरी (गोंड आदिवासी महिला विकास प्रकल्प) कार्यरत आहे. संचालिका श्रीम. अनघा पुरंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गोंड आदिवासी बांधवांकडून विविध कलात्मक वस्तू करून घेतल्या जातात. **'गोंड चित्रकला'** ही स्थानिक आदिवासी समाजाची वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा आहे. ह्या कलेच्या अनुषंगाने ह्या संस्थेतर्फे अनेक विविध वस्तू उदा. सुती स्टोल, योग आसन, साडी कव्हर, रुमाल, लॅपटॉप बॅग, किचन एप्रन, टेबल क्लॉथ यावर पेंटिंग करण्यात येते.


## आय. आय. जी. (I. I. G) एज्युकेशनल आणि डेव्हलपमेंट ट्रस्ट

२०१७ साली स्थापन झालेली मुंबईस्थित ही संस्था दिव्यांगाना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी मार्गदर्शन करते. एल.इ.डी आणि सोलर ही आत्ताच्या काळाची गरज ओळखून दिव्यांग व्यक्तींना या क्षेत्रात सक्रिय करण्याचे काम या ट्रस्टमार्फत केले जाते. विविध प्रकारचे टॉर्च, दिव्यांचे लाईट रिचार्जेबल स्वरूपात निर्मिल्या जातात. जवळजवळ २६० दिव्यांग आतापर्यंत प्रशिक्षित झाले. या ट्रस्टचे विश्वस्त स्वतः अंध व्यक्ती आहेत. महाराष्ट्रातील हे पहिले अंध ज्यांची स्वतःची एल.इ.डी. उत्पादनांची कंपनी आहे. ४ पेटंट त्यांच्या नावावर रजिस्ट्रर असून महाराष्ट्रभरातील अंधांना इलेक्ट्रॉनिकच्या क्षेत्रात आणण्यासाठी मार्गदर्शन शाळा आयोजित केली जाते. या मार्गदर्शन शाळांमधून दिव्यांग व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात स्वतःचे व्यवसाय सुरू करून दिले आहेत.





## वर्धिष्णू – गाथा सोशल+ रिसर्च आणि डेव्हलपमेंट सोसायटी



कचरावेचक, बालमजूर तसेच आर्थिक दुर्बल घटकातील मुला-मुलींना सुरक्षित व आनंददायी बालपण मिळावे यासाठी २०१२ पासून 'वर्धिष्णू सोशल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सोसायटी' ही संस्था जळगाव येथे कार्यरत आहे. जळगाव, चोपडा तसेच अंमळनेर येथील २५० हून अधिक मुलां-मुलींबरोबर रोजचे काम केले जाते. आजपर्यंत ५०० हून अधिक मुलामुलींना संस्थेच्या आनंदघर या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेत दाखल करण्यात आले. यातील ४२ मुले दहावी पास होऊन उच्च शिक्षण घेत आहेत. या आनंद घरातील मुलांचे पालक तसेच दहावी-बारावी पास झालेली मुलंमुली यांना शाश्वत आणि सन्मानपूर्ण रोजगार मिळावा यासाठी **'गाथा'** या उपक्रमाची सुरुवात संस्थेने आली. या अंतर्गत काम करणाऱ्या महिलांना पूर्णवेळ रोजगार दिला जातो. या उपक्रमा अंतर्गत पारंपरिक **गोधडी, बेबी दोहर**, राजस्थान येथील सांगनेरी तसेच कंथा या कॉटन कपड्यापासून तयार होणाऱ्या वारली प्रिंट, **कुर्ती**, जॅकेट, फ्रीज बॅग्सचे उत्पादन होते. तसेच वेगवेगळ्या प्रकारचे दिवे तयार केले जातात. गाथा उपक्रमाचा हेतू आर्थिक दुर्बल महिलांना रोजगार शाश्वत रोजगार आणि तेथील मुलांच्या शैक्षणिक आणि आरोग्याविषयी गरजा पूर्ण करणे हा आहे.

## प्रगती केंद्र



मतिमंद मुलांना स्वावलंबनाचे धडे देऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत करणारी 'प्रगती केंद्र' ही संस्था. माटुंगा येथील महिलाश्रम पथ, मनपा शाळेच्या इमारतीत भरते. या शाळेत

५ ते १८ वयोगटातील ४० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्याचबरोबर १८ वर्षावरील प्रौढ मतिमंदांना प्रोत्साहित करण्यासाठी प्रशिक्षण केंद्र सायन येथे चालविण्यात येते. कागदी, कापडी एनव्हलप, कापडी पिशव्या, कुंदन रांगोळ्या, दिवे अशा वस्तू ही दिव्यांग मुले शिक्षकांच्या मदतीने बनवितात.

## विश्वास चॅरिटेबल ट्रस्ट, मतिमंद मुलांचे केंद्र, ठाणे



'विश्वास चॅरिटेबल ट्रस्ट', हे गतिमंद मुलांचे केंद्र. ठाणे येथे कार्यरत आहे. संस्थेतील १८ ते ४५ वर्ष वयोगटातील गतिमंद मुलांकडून अनेक वस्तू बनवून घेतल्या जातात. उदा. रांगोळ्या, तोरणे, आकाशकंदिल, पेपरची व ऑरगंडीची फुले, पुष्पगुच्छ इ. या वस्तूंच्या विक्रीतून मुलांना त्याचा मेहनताना दिला जातो. अशा गतिमंद मुलांना आत्मनिर्भर होण्यासाठी त्यांनी निर्मित केलेल्या वैविध्यपूर्ण वस्तू समाजाने विकत घेणे आवश्यक आहे.

## कृती एक्सपीडीशन




कर्वेनगर, पुणे येथील २०२१९ साली स्थापन झालेली 'कृती' ही संस्था. शहरातल्या जनतेच्या गरजा आवडीनिवडी कोणत्या त्या हेरून त्याप्रमाणे गरजू महिलांकडून उत्पादने करून घेण्याचे काम करणारी कृती एक्सपीडीशन. खेडोपाड्यापर्यंत पोहोचवून तिथल्या लोकांना सक्षम आणि गरजू महिलांना रोजगार मिळावा यासाठी कृती एक्सपीडीशन ही संस्था सुरू करण्यात आली. सोलापूर येथील मंगळवेढा तालुक्यात शिरनांदगी गावात वैविध्यपूर्ण वस्तू उत्पादीत करून घेण्याचे काम संस्थेतर्फे करून घेण्यात येते.


हे काम करत असताना कृती एक्सपीडीशन पर्यावरणाचे भान विसरत नाही त्यामुळे ज्यूट पासून वेगवेगळ्या बॅग्ज, पर्सेस, पाऊचेस, गृहपयोगी वस्तू, विविध स्टेशनरी उत्पादने करण्यावर भर दिला जातो.

## अरणी कलाकेंद्र, वेहेलपाडा, पालघर



पालघर जिल्ह्यातील विक्रम गड तालुक्यापासून साधारण १३ किलोमीटरवर असणारा हा आदिवासींचा पाडा. सुधारणांचे वारे अद्याप या गावापर्यंत पोहोचलेले नाहीत. रोजगाराच्या संधी खूपच कमी. त्यामुळे स्थानिक मुली, महिलांना रोजगार उत्पन्नाचे साधन मिळावे म्हणून विक्रमादित्य घाग यांनी हे कलाकेंद्र सुरू केले. संपूर्णतः निसर्गातीलच वस्तू वापरून त्यापासून कलात्मक वस्तूंची निर्मिती हे उद्दिष्ट. नारळाच्या करवंटीपासून चहा, कॉफीचे मग, झाडाच्या बियांपासून कानातले, लाकडापासून बनविलेले नेकलेस, वारली पेंटींग, बांबूचे पेन स्टॅण्ड, की होल्डर अशा जवळजवळ २५ पेक्षा जास्त हस्तनिर्मित वस्तू बनविल्या जातात. त्याचबरोबर ग्रामीण वस्तीमधील शिक्षण, शेती, आरोग्य या विषयातदेखील जागृती करण्याचे काम अरणी कलाकेंद्रातर्फे केले जाते. या उत्पादनांच्या विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून या संस्थेला त्यांचे कार्य अधिक सक्षमपणे करण्यासाठी प्रोत्साहन लाभेल.

## S.V.R.R., ताडदेव



ताडदेव येथे मतिमंद वर्गाला (स्त्री, पुरुष) व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी १९६५ पासून कार्यरत असणारी ही संस्था. संस्थेची आजपावेतो शहरी आणि ग्रामीण भागात मिळून संस्थेची जवळजवळ ८ ट्रेनिंग सेंटर्स आहेत. अशा मुलांकडून त्यांच्या क्षमतेनुसार कार्ड बोर्डपासून फाईल्स, फोल्डर्स बनविणे, योग आसन, टॉवेल्स, डस्टर्स, डोअर्स मॅट तसेच किचन नॅपकिन्स, एप्रन्स, साडी कव्हर, पाऊचेस आणि विविध हस्तकलेल्या वस्तू तयार करून घेतले जातात. या उत्पादनांच्या विक्रीसाठी विविध प्रदर्शने आणि व्यावसायिक संस्था ह्या माध्यमातून विक्री

केली जाते. त्यांच्या ह्या सामाजिक कार्यासाठी संस्थेला विविध पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.



## दीपस्तंभ मनोबल

दिव्यांग व्यक्तिंमध्येही अनेक कलागुण असतात. फक्त ते हेरून त्यातून निर्मिती करण्याचे कसब पणाला लावावे लागते. जळगाव येथील 'दिपस्तंभ मनोबल' या संस्थेतील मुलांनी निर्मिती केलेली उत्पादने बघता ही खरोखरच दिव्यांगांनी केलेली आहेत यावर विश्वास बसत नाही. मॅक्रम आणि लाकडापासून बनविलेली प्लांट हँगर, वॉलपिस, अतिशय सुंदर पर्सेस, मॅक्रमचे बेंच आणि स्टुल (सेटी) सेट्स, डोअर मॅट, पेन स्टँड, पार्टी बॅग्ज, कॉलेज बॅग, ट्रॅव्हल किट्स, मोबाईल कव्हर्स अशी कित्येक उत्पादने स्वतःसाठी आणि भेट देण्यासाठी उपयुक्त असणारी. संस्थेतील विद्यार्थ्यांना केलेली अशी उत्पादने अतिशय नाविन्यपूर्ण उत्पादने खरेदी करून आपण त्यांच्या कार्याला हातभार लावू शकतो.



## सवेरा

महाराष्ट्र स्टेट वूमेन्स काऊंसिल (MSWC) ह्या संस्थेची सवेरा ही उपशाखा. मतिमंद मुलांसाठी साधारण ६ ते ४० वयोगटातील मतिमंद मुलांसाठी कार्यरत असलेली ही संस्था. व्यावसायिक प्रशिक्षण आणि शैक्षणिक प्रगती करण्याच्या उद्दिष्टातून त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करण्यासाठी कार्यरत असणारी ही संस्था. ६ ते १८ वयोगटातील मुलांना मातृभाषेतून (मराठी, हिंदी) शिक्षण देणे. प्राथमिक गणिताचे ज्ञान, संगणकीय शिक्षण दिले जाते. मुलांसाठी त्यांच्या वागणुकीसंदर्भात समुपदेशनही केले जाते. साधारण १८ वर्षानंतर ही मुले त्यांच्या व्यावसायिक कार्यशाळेमध्ये डस्टर्स, रायटिंग पॅड, पणत्या, पेपर बॅग्ज, ज्यूट बॅग्ज, रुमाल अशी उत्पादनेही तयार करतात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची पार्श्वभूमी असलेल्या या मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी संस्थेला प्रायोजक (Sponsorships) आणि देणगीदारांची (Donations) ची मदत होते. आपणही ह्या मुलांनी निर्मिती केलेली उत्पादने घेऊन त्यांना सक्षम करण्याच्या दिशेने ह्या संस्थेला हातभार लावू शकतो.

## पुर्नवास मतिमंद मुलांची शाळा



गोरेगाव येथील मतिमंद मुलांसाठी असलेली शाळा कै. प्रभाकर मोडक यांनी १९८१ मध्ये स्थापन केली. ह्या शाळेतील मानसिक विकलांग मुले कापडी एप्रन, पणत्या, एनव्हलप्स, रांगोळ्या, तोरणे बनवितात.

## स्व आधार मतिमंद मुलींचे बालगृह, उस्मानाबाद




उस्मानाबाद येथील शहाजी चव्हाण या सामाजिक कार्यासाठी वाहून घेतलेल्या एका संवेदनशील व्यक्तीने सुरू केलेली तुळजाई प्रतिष्ठान नावाची बहुउद्देशीय संस्था. उस्मानाबाद जिल्ह्यातील पानगाव येथे ही संस्था कार्यरत असून गतिमंद, एचआय.व्ही, कर्णबधीर, मूकबधीर ह्यांच्यासाठी ही संस्था कार्यरत आहे. ४३ एचआयव्ही बाधीत मुलांचा अत्यंत आपुलकीने शहाजी चव्हाण सांभाळ करतात. एचआयव्ही बाधित मुलांचे सहारा बालगृह चालवले जाते. यासाठी अनेक नामांकने त्यांना प्राप्त झाली आहेत. त्याचबरोबर मतिमंद मुलांच्या पालकांनी रस्त्यावर, रेल्वेस्टेशनवर सोडून दिलेल्या ३७ मुलींचा सांभाळ शहाजी करतात. त्यांच्या ह्या कामाला आर्थिक मदतीची गरज आहे. सरकारी अनुदान पुरत नाही. अशा मुलांना लागणारी औषधे मिळणे हे ही बऱ्याचदा कठीण असते. अशा प्रतिकूल परिस्थितीतही त्यांचे काम जोराने चालू आहे. येथील मतिमंद मुलींना अनेक प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते जसे की अगरबत्ती, मण्यांचे दागिने, कापडी पिशव्या, शेणापासून पणत्या तयार करणे अशी विविध उत्पादने ह्या मुलींकडून करून घेतली जातात. गरज आहे ती या उत्पादनांना ग्राहक मिळण्याची. तरच ती आत्मनिर्भर होऊ शकतात.

## दुवा संकलन, संवर्धन केंद्र, पुणे



'दुवा संकलन' केंद्र, पुणे ही संस्था जुने कपडे संकलित करून त्यापासून काही कलात्मक वस्तू बनविते. थोडक्यात जुन्या, वापरलेल्या कपड्यांचा कलात्मक पुर्नवापर करून पायपुसणी, आकर्षक बटवे, तोरणे, झाडे लावायची पिशवी, टेबल मॅटस् तयार केली जातात. या कामातून अनेक गरजू महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

## आई डे केअर संस्था, पेण



मानसिक आणि शारिरीक अपंगत्वाचे प्रश्न हे त्या कुटुंबाचेच प्रश्न नसून समाजाचेही प्रश्न आहेत. याचे भान ठेवून अशा विशेष बालकांना आपल्या पायावर उभे करण्यासाठी, सक्षम करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे यासाठी 'आई डे केअर' ही संस्था पेण येथे कार्यरत आहे. ही बालके आयुष्यभर इतरांवरच अवलंबून असतात. त्यांच्या आईवडीलांच्या हयातीत आणि त्यांच्या पश्चातही या बालकांची उत्तम प्रकारे देखभाल करणे ही काळाची गरज आहे. हे ओळखून त्यांना आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न केला जातो त्यासाठी त्यांच्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातून मेणबत्त्या, कागदी फुले, ग्रीटिंग कार्डस् इ. तयार करून घेतले जातात. वाचादोष असलेल्या विद्यार्थ्यांना बोलता यावे यासाठी उपचार केले जातात.

## कुमुदबेन व्होरा इंडस्ट्रिअल होम फॉर ब्लाईंड वुमेन, अंधेरी, मुंबई

मुंबईतील अंधेरी (प), उपनगरात अंध मुलींसाठी असलेले



हे वसतीगृह. अंध व्यक्तींना स्वयं रोजगारासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण येथे दिले जाते. ही संस्था अंध मुलींना आत्मनिर्भर करण्यासाठी प्रशिक्षण देते. हातमागावर ह्या मुली अतिशय सुबक पंचे, नॅपकिन्स बनवितात. तसेच स्टॉकींग्जची फुले, बुके, झाडू तयार करणे याचे ही प्रशिक्षण दिले जाते.

## पाऊलवाट फाऊंडेशन, पासली, ता. वेल्हा



सह्याद्रीच्या डोंगरात तोरणा किल्ल्याच्या मागे तालुका वेल्हा येथे अतिशय दुर्गम समजल्या जाणाऱ्या १८ गावं मावळ येथे 'पाऊलवाट फाऊंडेशन' गेली १२ वर्ष कार्यरत आहे. अतिशय दुर्गम ग्रामीण भाग, वाहतूकीची सोय नाही. त्यामुळे जमिनी विकणे आणि रोकड पैसा कमावणे इथे गावकरी गुंतलेले असतात. अशा ग्रामीण तरुणांसाठी सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, आरोग्य आणि रोजगारासाठी ही संस्था कार्यरत आहे. ८ ते १० मुलांसाठी एकच शाळा तेही जवळजवळ जाऊन येऊन प्रवास २४ किलोमीटरचा आहे. यांचं आयुष्य थोडंतरी सुखकर व्हावं ह्यासाठी 'पाऊलवाट फाऊंडेशन'नी निवासी वसतीगृह चालू केले आहे. जवळजवळ दीडशे विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग झाला. येथे बांबूचे प्रचंड उत्पादन होते. ते तोडून विकण्यापेक्षा बांबूचे अप्रतिम आकाश कंदिल, बांबूच्या वस्तू तयार करून रोजगार निर्मितीचा प्रयत्न केला जातो. दुबार शेतीचा प्रयोग त्यामुळे कांदा, कडधान्य, नाचणी यासारखी पिके घेतली जातात. संस्थेला गरज आहे ती शैक्षणिक साहित्याची आणि त्यानी निर्मिलेल्या उत्पादनांना व्यासपीठ देण्याची.

## आदिवासी सहज शिक्षण परिवार– मासवण, ता. पालघर




पालघर तालुक्यातील ही संस्था ग्रामीण भागातील महिला आणि मुलांच्या सक्षमीकरणाकरता प्रयत्न करते. दुर्गम भाग त्यामुळे नेटवर्क नाही त्यामुळे मुले शिक्षणापासून वंचित. इथे या संस्थेने नवीन प्रयोग राबविला गेला. पहिली ते चौथी वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षणाची गोडी लागावी म्हणून 'खेळघर' (बालवाडी) सुरू केले. दहावी पास झालेली मुले पहिली ते चौथीच्या वयोगटातील मुलांसाठी खेळघर नावाने बालवाडी चालवितात. मुलांना वाचनाची आवड लागावी म्हणून पुस्तक गाडीचा उपक्रम राबविला जातो. पालघर भागात **वारली कलेची परंपरा आहे**. त्याचाच वापर करून तेथील महिला **टीशर्ट**, पिशव्या, पर्सेस, फोल्डर्स रंगवतात. दहावीनंतर जी

मुलं, मुली कॉलेज शिक्षण घेऊ इच्छितात त्यांच्यासाठी सर्वो तोपरी मदत केली जाते. अशी जवळजवळ ४० मुलंमुली यातून शिक्षण घेत आहेत.


संस्थेला त्यांच्या उल्लेखनीय कामासाठी वेगवेगळ्या १३ संस्थांकडून पुरस्कार मिळालेले आहेत. आपणही या संस्थेला शैक्षणिक साहित्याची मदत आणि त्यांची उत्पादने खरेदी करून मदत करूया.

## दिव्य विद्यालय– गुलमोहर मतिमंद व अंध विद्यार्थ्यांची निवासी शाळा, जव्हार



अंध मुलांची निवासी शाळा आणि मतिमंद मुलांची निवासी शाळा असे दोन उपक्रम गुलमोहर दिव्य विद्यालय या नावाने जव्हार मोखाडा भागात राबविले जातात. पालघर जिल्ह्यातील ही पहिली मतिमंद मुलांची शाळा. दिव्यांगांना मूळ प्रवाहात सामावून घेण्यासाठी ही संस्था कार्यरत आहे. अंध विद्यार्थ्यांना ब्रेन लिपी, अबॅकस या माध्यमातून शिक्षण देण्यात येते. ही मुले लाकडी टी कोस्टर्स, पणत्या रंगविणे, की होल्डर्स, पेन स्टँड, चमचा ट्रे, गांडूळ खत अशा विविध वस्तू तयार करतात. विविध पुरस्कारांनी या संस्थेला गौरविण्यात आलेले आहे.

## विद्या विकास मंडळ



अंधेरी मुंबई येथील माध्यमिक शाळा. विद्यार्थी बहुतांश आर्थिकदृष्ट्या मध्यम वर्गातील. संस्थेच्या जेष्ठ कार्यकर्त्या आणि हौशी कलाकार सविता ताई मुलांच्यातील कलागुणांना हेरून त्यांच्याकडून विविध कलाकुसरीच्या उत्तम वस्तू करून घेतात, ह्या वस्तू विक्रीतून ह्या मुलांच्या पालकांना थोडाफार आर्थिक हातभार लागतो. मुलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळते.

ह्या व्यतिरिक्त धान्य बँक संकल्पना, दत्तक योजना, अवयव दान यासारख्या अनोखे सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थाही ''सेतू बांधा रे'' च्या प्रकल्पात सामील होत आहेत.

अशा या वंचितांसाठी धडपडणाऱ्या काही अप्रकाशित संस्था. आपल्या कल्पनेपलिकडच्या अशा अनेक संस्थांना आपला मदतीचा हात आपण पुढे करू शकतो. तेव्हा यायला विसरू नका, या उपक्रमाचा जितका म्हणून प्रचार प्रसार करता येईल तेवढा करा. ♦

---

# चेंबूर येथे पहिल्यांदाच पंचायत पेठेचे पदार्पण

**प**दार्पणातच खूप काही गवसले अशी भावना चेंबूर येथे आयोजित केलेल्या पहिल्यावहिल्या पंचायत पेठेने मनात दाटून आली. ८ ते १२ सप्टेंबर २०२३ या कालावधीत चेंबूरच्या मुक्तानंद विद्यालयात संपन्न झालेल्या या पेठेने ४८ लाखांची उलाढाल केली. या निमित्ताने नवीन उत्साही कार्यकर्त्यांची एक सक्षम फळी उभी राहिल्याचे प्रकर्षाने जाणवले.

या पहिल्यावहिल्या पंचायत पेठेचे उद्घाटन एन.जी. आचार्य आणि डी.के.मराठे कॉलेज महाविद्यालयाचे गव्हर्निंग कौन्सिल सदस्य श्री. शैलेश आचार्य यांचे हस्ते संपन्न झाले. संस्थेचे अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते उपस्थित होते.

पेठेच्या कालावधीत एका संवाद संध्येचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे आणि संस्थेचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. कमलाकर पेंडसे यांनी नव्या-जुन्या कार्यकर्त्यांबरोबर संवाद साधला.

भविष्यात हा विभाग नव्याने, उत्साहाने कार्यरत होऊन संस्थेच्या चळवळीच्या कामात नक्कीच कार्यरत होईल असा विश्वास कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांनी व्यक्त केला.



चेंबूर येथे पंचायत पेठेचे उद्घाटक श्री. शैलेश आचार्य.

# ग्राहक पंचायत पेठ २०२३

**लोपामुद्रा सारीज**
लोपमुद्रा साडी (हातमाग), ड्रेस मटेरिअल्स, कापड तागे, तयार ब्लाऊज, तयार ड्रेसेस, ओढण्या

**रसिका अलंकार**
मायक्रो गोल्ड प्लेटेड ज्वेलरी

**ग्रासा ग्लास आर्टिफॅक्टस्**
काचेचे दिवे, पूजा सेटस्, अत्तरदाणी इ.

**सदाफुली**
महेश्वरी, चंदेरी, हॅण्ड पेंटेड टसर, कॉटन अँण्ड सिल्क खण साडी, लिनन इ.

**मारवा कलेक्शन**
महेश्वरी, चंदेरी, डाबू प्रिंट, कलमकरी, पटोला इत्यादी साड्या

**गुजरात हॅंडिक्राफ्ट**
मण्यांपासून बनवलेल्या की चेन्स, ड्रेससाठी डेकोरेटीव्ह पट्ट्या, पैंजण, तोरण, लटकन, टेबलमॅट, घट अशा भेटवस्तू!

**सारा कलेक्शन**
कॉटन, जयपूर, चिकन, खादी डेनीम, चंदेरी विविध प्रकारचे कुर्ते

**सोहळा पारंपरिक संस्कृतीचा**
९ वारी रेडिमेड लुगडी, राजलक्ष्मी, मस्तानी, ब्राह्मणी मराठी इ.

**वीन आर्ट अँड क्राफ्ट**
कागदापासून बनवलेल्या शोभेच्या वस्तू

**नागपूर स्पेशल**
चादरी, सतरंजी इ.

**नेचर्स वूड लाकडी खेळणी**
सावंतवाडी स्पेशल लाकडी खेळणी

**अखंडज्योत**
अखंड तेवणारी ज्योत, टाळ, घंटी, छोटे चौरंग, पाट, वजनदार वस्तू उचलण्यासाठी बेल्ट सेट.

**कोकोनट कॉयर प्रॉडक्ट**
नारळाच्या काथ्यापासून निर्मित विविध वस्तू, कुंडी, शोभेच्या वस्तू

**पिपा क्रिएशन**
विविध आधुनिक फॅशनचे रेडीमेड ब्लाऊज

**उद्यमिता पर्सेस**
बचत गटांच्या महिलांनी बनवलेल्या पर्सेस

**अनुराधाज् कलेक्शन**
महेश्वरी, कलमकारी, प्युअर सिल्क ड्रेस मटेरिअल

**विनय एंटरप्रायझेस**
किचनमधील विविध ग्राहकोपयोगी वस्तू

**महाटेक्स**
महाराष्ट्र हातमाग विणकर संघाची दर्जेदार उत्पादने.

**शिल्पनील कलेक्शन**
तांबा, पितळ मूर्ती आणि भांडी, पूजा साहित्य

**सयाना आर्टस अँण्ड गिफ्टस्**
तोरण (मोती, मेटल), मोत्याचे हार, रेडिमेड रांगोळ्या व इतर गिफ्टस्

**अंकुर क्रिएशन**
बाटिक, कांथावर्क बेडशिस्टस्, बांधणी ड्रेस मटेरिअल

**गेवी क्लिनिंग**
साफसफाईची उत्पादने

**मुंबई ग्राहक पंचायतीच्या पेठेचा अनोखा अनुभव घ्याच!**

**युथोपिया**
गाईच्या तुपापासून बनवलेल्या रसायन विरहीत आकर्षक रंगांच्या लिपस्टीक्स, फाऊंडेशन क्रीम इत्यादी दर्जेदार उत्पादने

**योटॉईझ**
मराठी मध्ये रंगीत आकर्षक कापडी पुस्तके

**वंश गाईड इनोव्हेटिव्हज्**
फोल्डींग चटई

**हरीओम वूड वर्क्स**
लाकडाच्या विविध कलात्मक वस्तू

**सायका होम अँण्ड हायजीन प्रॉडक्टस्**
बायोडिग्रेडेबल वस्तुंपासून साफसफाई उत्पादने

**अर्थिता**
विविध ऑर्गनायझर्स

**आयुज् कलेक्शन**
कॉटन जयपुरी, ड्रेस मटेरिअल इ.

**आर्ट इन संस्कृती**
सेमी प्रेशिअस स्टोन, ग्लास बीड्स, जर्मन सिल्वर ज्वेलरी.

**ऊब**
हस्तकलेच्या गोधड्या बेडींग, पायपुसणे

**ब्लॉसम अँण्ड इन्सेंस**
परफ्यूम्स

**मिथ परफ्यूम व अगरबत्ती**
विविध प्रकारची अत्तरे, सुगंधी अगरबत्ती

**जेम्रे ब्रॅड**
कॉटन हॅंडलूम इ. ड्रेस मटेरिअल फ्रेंच क्रेप कुर्ती, दुपट्टा


ग्राहक पेठ २०२३
सूचना:
रंगीत चित्रे
प्रत्यक्ष उत्पादनांची नसून
प्रातिनिधिक आहेत
एस.के. एंटरप्रायझेस
फोल्डिंग टेबल,
इतर फर्निचर
शुभम ज्वेलरी
मोत्याचे व गोल्ड पॉलिशचे विविध दागिने, तोडे, पाटली, नेकलेस
दिया क्विल्ट
फोन चार्जर, सौंदर्य प्रसाधने, साडी-ब्लाऊज इ. ऑर्गनायझर आकर्षक फोल्डर तसेच रजया इ.
शीलाताई फूड प्रॉडक्ट
प्रिझर्व्हेटिव्हज् न वापरलेली उत्पादने. केशर वेलची सिरप, आले लिंबु पाचक इ. आवळ्याची उत्पादने
दुर्वांजल क्रिएशन
रेयॉन, कॉटन कुर्ती, घागरा, चोली दुपट्टा सेट इ.
महावीर ट्रेडर्स/क्रोकरी
फॅन्सी क्रोकरी, बनीयन्स्, सॉक्स, रुमाल इ.
अर्बन रुट अॅग्रो
चिंध्यांपासून बनविलेले कागद व कागदाच्या विविध वस्तू
नारी बुटिक
शॉर्ट अॅण्ड लाँग कुर्ती (बाघरू व दाबू प्रिंटस) स्त्रिया व पुरुषांसाठी
कियान कलेक्शन
हेअर बँड, क्लिप्स, लहान मुलींच्या क्लिप्स, हेअर एक्स्टेंशन, डिझायनर क्लिप्स
बियाँड फ्रेम्स
सुकलेल्या पानांफुलापासून बनवलेल्या शोभिवंत फ्रेम्स
कर्णिक कृषी उद्योग
गुलकंद तसेच शेजवान सॉस, हार्टीका चटणी
पॅकेम् टोट बॅग्ज अॅण्ड वॉलेट
वॉलेट्स, टोट बॅग्ज, डेनिम बॅग्ज
उर्जा गिफ्ट
विविध प्रकारच्या फॅब्रिकच्या बॅग्ज
देसाई आर्ट
मातीच्या पेंटिंग केलेल्या शोभेच्या वस्तू
जान्हवी आर्टस्
फ्रीज मॅग्नेटिक स्टिकर, फ्रेम, गिफ्ट बॉक्सेस
डेको व्हिले
विविध प्रकारचे पाऊच, वॉलेट, बॅग्ज इ.
प्रथम डेकॉर
कॅन्डल स्टॅन्डस्
रोहिदास क्लॉथ सेंटर
एम्ब्रॉयडरी कुर्तीज, छोट्या मुलींच्या कुर्ती
चेतना स्टील
स्टील भांडी व उपकरणे
महालक्ष्मी एंटरप्रायझेस
चमचे, सुऱ्या, पळ्या, किसणी, पोळपाट लाटणे इत्यादी
अनंत बुक सेलर्स
कथा कादंबऱ्या, संत साहित्य, बाल साहित्य इत्यादी
फन क्राफ्ट
मुलांसाठी विविध फन गेम्स
मे. वेस्टर्न घाट अॅग्रो इंडस्ट्रिज
विविध प्रकारचे मध
माथेरान चप्पल
श्री विनायक एंटरप्रायझेस
साफसफाईसाठी लागणारे विविध ब्रश, स्पंज इत्यादी
पल्लवी कव्हर्स
सोफा, फ्रीज हँडल, टॉप, मिक्सर, साडी इ.चे कव्हर्स
फॅशन क्युरा ज्वेलरी
टेरा-कोटा ज्वेलरी
आरतीज् बॅग
हॅण्ड पेंटेड पर्सेस, बॅग्ज, स्टोल्स, कंदील, फोल्डिंग बिछायत
रंगोली क्रिएशनस्
फोल्डिंग रांगोळ्या आणि चौरंग
श्री महालक्ष्मी आर्टस्
पारंपरिक व अॅण्टिक ज्वेलरी
SVRR ताडदेव
दिव्यांग कलाकारांनी केलेल्या वस्तू
विश्वास
नेत्रदान
आधार
गतिमंद मुलांनी उत्पादित केलेल्या वस्तू
शांतीवन
कुष्ठरोग निवारण आश्रमातर्फे उत्पादित वस्तू
सदगुरू
दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या वस्तू


ग्राहक पंचायत पेठ २०२३
श्री सिल्क
कांचीपुरम, कांजीवरम, वेडींग सिल्क सारीज
माहिष्मती
महेश्वरी स्पेशल साडी, चंदेरी कॉटन हँडलूम साड्या, कुर्ता दुपट्टा सेट
दिनेह कलेक्शन
कॉटन, इरकली, पुणेरी, इंदुरी साड्यां
सोहनी क्रिएशन
विविध प्रकारचे गाऊन
स्वामिनी कलेक्शन
विविध साड्या
PooAm's carry-a-way...
रॉ सिल्क ज्यूटच्या मटेरियलच्या शॉपी बॅग्स आणि पर्सेस!
शीतल बॅग्ज
रेग्झिनने बनवलेल्या मजबूत बॅग, सॅक, प्रवासी बॅग
विकास लेदर
लेदर पर्सेस, बॅग, लेदर जॅकेट आणि लॅपटॉप बॅग
स्टेप-इन-वॉक
चप्पलस्, सँडल्स, शूज इ.
हुगळी हँडीक्राफ्ट
हाताने केलेले कशिदाकाम,ड्रेस मटेरीअल, कलकत्ता साड्या, ढाकाई, जामदानी सिल्क....
प्रथा कलेक्शन
लखनऊ स्पेशल कुर्ती, टॉप्स, अनारकली इ.
मल्हार क्रिएशन
२ ते १२ वर्षा पर्यंतच्या मुलींचे फ्रॉक, बाळंतविडा इ.
एम ॲण्ड एम्स् एक्सक्लूझीव्ह
शॅडोवर्कचे काम केलेले जीन्स-टॉप्स, शिफॉन, जॉर्जेट, कॉटन शॅडोवर्क साड्या, ड्रेस मटेरीअल
ओमकार मार्केटींग
हार्ड ॲनोडाइजड किचनवेअर्स
ब्लिस् टी शर्टस्
मोठ्यांचे व लहान मुलामुलींचे टी-शर्टस्
प्रयोग क्रिएशन
हॅण्ड पेंटेड बॅग्ज
अद्विका/स्माईल्स् किडस् फॅशन
लहान मुलींचे फ्रॉक्स, नाईट सूट इ.
भारतीय खादी सेंटर
पायजमे, पैरण रंगीत कुर्ते, शॉर्ट कुर्ते, शर्टस, शॉर्ट पँट, नाईट ड्रेसेस
स्वस्तिक होजियरी
लहान मुलांचे कपडे, स्त्रियांची अंतर्वस्त्रे, स्लीप
जिजाबाई बचत गट
विविध प्रकारच्या बॅग्ज, कुशन कव्हर्स, पठाणी कुर्ता इ.
राधा फॅशन्स
ड्रेस मटेरीयल आणि हॅण्ड वर्क कुर्ती मटेरीयल
लुक ॲट मी
सर्व वयोगटांसाठी नाईट सूट
प्रिती गार्मेंटस्
गाऊन्स, नाईट वेअर
रमा कलेक्शन
रेडिमेड ड्रेस मटेरियल
राजू एम्ब्रॉयडरी
कांथावर्क, मुर्शिदाबाद सिल्क साड्या, कलकत्ता एम्ब्रॉयडरीचे ड्रेस मटेरीयल
जयपूर हँडलूम
जयपुरी चादरी, ड्रेस मटेरियल
मोहक क्रिएशन
स्त्रिया व मुलींसाठी कुर्तीज
कायरा कलेक्शन
वैविध्यपूर्ण ड्रेस मटेरिअल आणि कुर्तीज
स्वप्नालंकार
मोती पोवळी, पाचू, दागिने !

# ग्राहक पंचायत पेठ २०२३

**अथर्व कलेक्शन**
जामदानी, कोरा, इरी, बनारसी, कोसा सिल्क साड्या

**निलम क्रिएशन**
कॉटन कुर्तीज, शॉर्ट टॉपस्

**झियाज ट्रेजर ऑफ कच्छ**
कच्छ स्पेशल, काथा, अंगरखा, कुर्ती, पॅटर्न कुर्तीज, दुपट्टा, स्टोल्स

**जे.जे. एंटरप्रायझेस**
विविध प्रकारचे स्वेटर्स

**एस ॲण्ड एस बॅग्ज**
डिझायनर पर्सेस

**पूजा क्रिएशन**
विविध प्रकारचे गाऊन्स, नाईट सूट, छोट्या मुलींचे गाऊन, इ.

**मायलेकी**
बटिक प्रिंटेचे गाऊन्स

**वित्ताशी एंटरप्रायझेस**
हॅण्ड ब्लॉक, अजरख प्रिंट साड्या, ड्रेस मटेरिअल आणि स्टोल्स

**स्पर्श क्रिएशन**
लखनौ स्पेशल विविध प्रकारचे कुर्तीज

**कर्मा वस्त्रांकन**
कॅलीग्राफी टी शर्ट

**वल्लरी फॅशन**
डेनीमच्या कुर्तीज्

**सिमरन कलेक्शन**
जयपूर प्रिंट असलेले कुर्ते, बाटीक क्रशचे कुर्ते

**ब्लॉक्स ॲण्ड बाटिक्स**
ब्लॉक्स, बाटिक्सच्या बेडशीट व बॅग, कुशन, पिलो कव्हर्स, कुर्ती-दुपट्टा सेट

**निओ गार्मेंटस्**
मराठी संदेश लिहिलेले टीशर्ट, ट्रॅक सूट

**लक्ष्मी वल्लभ कलेक्शन**
उत्तम शिवणीचे टिकाऊ पेटीकोटस् व गाऊन्स्

**आर.आर.क्रिएशन**
जयपुरी बेडशीट्स, बाटीक चादरी, सोलापूरी चादरी इ.

**स्वदेशी**
कॉटन शर्ट

**भाग्यश्री लेदर बॅग्ज**
लेदरच्या विविध बॅग, शांतिनिकेतन बॅग

**शिवम ब्रदर्स/बॅग्ज्**
चादरी, कुशन कव्हर्स, डेनीमच्या बॅग्ज

**युनिक कलेक्शन**
सिल्क, धर्मावरम, पटोला बांधणी, गझी सिल्क, काथा वर्क, कॉटन सिल्क, गढवाल सिल्क साड्या !

**माथेरान चप्पल**
सुंदर रंगसंगतीची चामडी पादत्राणे

**सजनी नाईटीज**
विविध प्रकारचे गाऊन्स, नाईटी, बाटीक, जयपुरी, हाफ गाऊन्स (वयस्कर स्त्रियांसाठी), नाईट सूट

**डी. टी. निटवेअर**
तरुणाईसाठी टी शर्टस्, बर्म्युडा पॅन्टस् इत्यादी

**शांभवी सिल्क सारीज्**
साऊथ कॉटन, गढवाल कोटा, पोचमपली बनारस मुंगा, अजरख मोडाल, कॉटन दुपट्टा इ.

**सॅफ्रॉन**
कलमकारी, ब्लॉक प्रिंट कुर्तीज् पॅंटस्

**अतरंगी मराठी टी शर्ट**
टीशर्ट

**डेकोव्हिले ज्वेलरी**
जर्मन, सिल्व्हर ज्वेलरी खास तरुणाईसाठी

**श्वेता कलेक्शन**
कॉटन सिल्क बांधणी, कांथा वर्क, टसर, सेमी पैठणी, कॉटन साडी

**अहिल्या महिला मंडळ**
मलमलच्या गोधड्या, बाळंतविडे

**ट्रॅडिशनल ऑर्नामेंटस्**
पारंपरिक अलंकार व आभूषणे

**मुंबई ग्राहक पंचायत**
मुंबई ग्राहक पंचायत — ग्राहक हिताय ग्राहक सुखाय
सभासद नोंदणी, शिक्षण, संस्थेची प्रकाशने, वितरण, शॉपी बॅग्ज इ.

# ग्राहक पंचायत पेठ २०२३ : दालन-तक्ता

| स्टॉलचे नाव | वैशिष्ट्ये | दादर | ठाणे | अंधेरी | वसई | बोरीवली |
|---|---|---|---|---|---|---|
| दिनेह कलेक्शन | सिको, गढवाल पैठणी, कॉटन इ. ५/९ वार साड्या | ✗ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| स्वामिनी कलेक्शन | इरकल, पेशवाई सिल्क, इचलकरंजी कॉटन साड्या | ✓ | ✗ | ✗ | ✓ | ✓ |
| युनिक कलेक्शन | विविध प्रकारच्या साड्या व पैठणी | ✓ | ✓ | ✗ | ✓ | ✗ |
| राजू एम्ब्रॉयडरी वर्क्स | आसाम, कलकत्ता स्पेशल, टसर सिल्क सारीज व ड्रेस मटेरिअल | ✓ | ✗ | ✓ | ✓ | ✓ |
| अथर्व कलेक्शन | जामदानी, कोरा, झ्री, बनारसी, कोसा सिल्क साड्या | ✓ | ✗ | ✗ | ✗ | ✗ |
| श्री सिल्क | कांचीपुरम, कांजीवरम वेडींग सिल्क, अजरख, मोडाल सारीज | ✓ | ✓ | ✗ | ✓ | ✓ |
| वित्ताशी एंटरप्रायझेस | हॅण्ड ब्लॉक, अजरख प्रिंट साड्या, ड्रेस मटेरिअल आणि स्टोल्स | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| मारवा कलेक्शन | महेश्वरी, चंदेरी, दाबू प्रिंट, कलमकारी, पटोला सारीज इ. | ✗ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| सदाफुली | महेश्वरी, चंदेरी, हॅण्ड पेंटेड, कॉटन ॲण्ड सिल्क खण साडी, लिनन, कॉटन ब्लाऊज | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✓ |
| माहीष्मती | महेश्वरी स्पेशल साडी, चंदेरी कॉटन हँडलूम साड्या, कुर्ती, दुपट्टा सेट | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| शांभवी सिल्क सारीज | विविध प्रकारच्या सिल्क/कॉटन सारीज, दुपट्टे व स्टोल्स | ✓ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| सोहळा पारंपरिक संस्कृतीचा | ९ वारी साडी (रेडीमेड) लुगडी, राजलक्ष्मी, मस्तानी, ब्राह्मणी मराठी इ. प्रकार | ✗ | ✗ | ✓ | ✗ | ✗ |
| श्वेता कलेक्शन | कॉटन सिल्क (बाटीक प्रिंट), कॉटन सिल्क सारीज, टसर सिल्क, खण सारीज | ✗ | ✗ | ✓ | ✗ | ✗ |
| लोपामुद्रा सारीज | लोपामुद्रा साडी (हातमाग), ड्रेस मटेरिअल्स, तयार ब्लाऊज | ✓ | ✗ | ✗ | ✗ | ✗ |
| सिमरन कलेक्शन | विविध प्रकारच्या कुर्तीज, प्लाझो सेट, डिझाईनर प्लाझो, डिझाईनर कुर्ती इ. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| मोहक क्रिएशन्स | फॅन्सी कुर्तीज, कलमकारी, इक्कत रेडिमेड कुर्तीज | ✓ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| सारा कलेक्शन्स | रेडीमेड कुर्तीज, प्लाझो, दुपट्टे इ. | ✗ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| स्पर्श क्रिएशन्स | लखनवी कुर्ती, पटियाला, प्लाझो, दुपट्टे इ. | ✓ | ✗ | ✓ | ✓ | ✗ |
| वल्लरी फॅशन | डेनिमचे कपडे- स्त्रिया, पुरुष व मुलांसाठीचे कपडे | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| कायरा कलेक्शन | लेगिंग, जॅकेटस, सिल्क कुर्तीज, ड्रेस मटेरिअल | ✓ | ✗ | ✗ | ✓ | ✗ |
| एम ॲण्ड एम्स एक्सक्लुझिव्ह | शॅडो वर्क हँड एम्ब्रायडरी कुर्ती, टॉपस्, साड्या | ✓ | ✗ | ✓ | ✗ | ✓ |
| सॅफ्रॉन | कलमकारी, ब्लॉक प्रिंट, कुर्तीज, पॅन्टस् | ✗ | ✗ | ✓ | ✓ | ✓ |
| निलम क्रिएशन | कॉटन टॉप्स आणि कुर्तीज | ✗ | ✓ | ✓ | ✗ | ✗ |
| प्रथा कलेक्शन | लखनऊ स्पेशल कुर्ती, टॉप्स, अनारकली इ. | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| झियाज् ट्रेजर्स ऑफ कच्छ | कच्छ स्पेशल, काथा, अंगरखा, कुर्ती, पॅटर्न कुर्तीज, दुपट्टा, स्टोल्स | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |

| स्टॉलचे नाव | वैशिष्ट्ये | दादर | ठाणे | अंधेरी | वसई | बोरीवली |
|---|---|---|---|---|---|---|
| दुर्वांजल क्रिएशन्स | शॉर्ट कुर्तीज, लाँग सिंगल कुर्तीज, पॅण्ट, टॉप घागरा चोली दुपट्टा सेट | ✓ | ✗ | ✓ | ✗ | ✗ |
| नारी बुटिक | शॉर्ट ॲण्ड लाँग कुर्ती पुरुष व स्त्रियांसाठी (बाघरू व दाबू प्रिंटस) | ✓ | ✗ | ✗ | ✓ | ✓ |
| रोहीदास क्लॉथ सेंटर | एम्ब्रॉयडरी कुर्तीज, छोट्या मुलांच्या कुर्ती | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✓ |
| राधा फॅशन्स | बाटिक, इक्कत्, बांधणी, चंदेरी ड्रेस मटेरिअल | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| अनुराधाज् कलेक्शन | महेश्वरी, कलमकारी, प्युअर सिल्क ड्रेस मटेरिअल | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| रमा कलेक्शन | ड्रेस मटेरिअल - कलमकारी सिल्क, संबळपुरी इक्कत, चंदेरी कॉटन | ✓ | ✗ | ✗ | ✗ | ✗ |
| आशूज कलेक्शन | विविध प्रकारचे ड्रेस मटेरिअल | ✗ | ✗ | ✗ | ✓ | ✗ |
| हुगळी हँडीक्राफ्ट | कोलकाता ड्रेस मटेरिअल, साड्या, चादरी इ. | ✗ | ✗ | ✗ | ✓ | ✓ |
| जेम्रे ब्रँड | कॉटन हँडलूम इ. ड्रेस मटेरिअल फ्रेंच क्रेप कुर्ती, दुपट्टा | ✗ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| स्वस्तिक होजिअरी | लेडीज अंडरगार्मेंटस् | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| लुक ॲट मी | सर्व वयोगटासाठी नाईट सूट | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| मायलेकी | बाटिक, जयपूर गाऊन्स | ✓ | ✗ | ✓ | ✓ | ✓ |
| प्रीती गार्मेंटस् | दर्जेदार गाऊन्स, फिडिंग गाऊन्स, नाईट ड्रेस | ✗ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| लक्ष्मी वल्लभ कलेक्शन | विविध रंगाचे परकर आणि गाऊन्स | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| सजनी नाईटीज | विविध प्रकारचे गाऊन्स, नाईटी, बाटीक, जयपुरी, हाफ गाऊन्स (वयस्कर स्त्रियांसाठी), नाईट सूट | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✓ |
| पूजा क्रिएशन | फिडींग गाऊन, नाईटीज, बाटिक प्रिंट, हाऊस कोट, कफ्तान | ✗ | ✓ | ✗ | ✓ | ✗ |
| सोहानी क्रिएशन | बाटिक, अल्पाईन, रॅप गाऊन, कॉटन गाऊन | ✓ | ✗ | ✗ | ✗ | ✗ |
| पिपा क्रिएशन | कॉटन वन पिस शॉर्ट, कॉटन स्कर्ट, फॅन्सी ब्लाऊज | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| निओ गार्मेंटस् | लहान-मोठ्यांचे टी शर्टस्, होजिअरी ट्रॅक सूट | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| डी.टी.निटवेअर | बनियन्स, ट्रॅकसूट, टी शर्टस्, सॉक्स इ. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| भारतीय खादी सेंटर | लेंगे, झब्बे, शर्टस्, पंचे, हातरुमाल, जॅकेटस् | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ब्लिस टी शर्टस् | ग्राफीक टी शर्टस् | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| अतरंगी मराठी टीशर्ट | मराठी टीशर्ट | ✓ | ✗ | ✓ | ✗ | ✓ |
| कर्मा वस्त्रांकन | कॅलीग्राफी टी शर्ट | ✗ | ✓ | ✗ | ✓ | ✗ |
| स्वदेशी | उत्तम प्रतीच्या कापडाचे शर्ट, पँटस् व बर्मुडा | ✗ | ✓ | ✗ | ✓ | ✓ |
| जयपूर हँडलूम | बेडशिट, ड्रेस मटेरिअल, रजया इ. | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| अहिल्या महिला मंडळ | मलमलच्या गोधड्या, बाळंतविडा व बाळाचे कपडे | ✓ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| शिवम् ब्रदर्स | दाबू प्रिंट, इक्कत बेडशिटस्, विविध पर्सेस, लोकरीचे कपडे, कुशन कव्हर्स, इ. | ✗ | ✗ | ✗ | ✓ | ✓ |
| नागपूर स्पेशल | बेडशिट, चादरी, पिलो कव्हर्स, सतरंजी इ. | ✗ | ✗ | ✓ | ✓ | ✗ |
| महाटेक्स | टॉवेल, सतरंज्या, दोहर | ✓ | ✗ | ✗ | ✗ | ✓ |
| अंकुर क्रिएशन | बाटिक, कांथावर्क बेडशिटस्, बांधणी ड्रेस मटेरिअल | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |

| स्टॉलचे नाव | वैशिष्ट्ये | दादर | ठाणे | अंधेरी | वसई | बोरीवली |
|---|---|---|---|---|---|---|
| आर.आर.क्रिएशन | सोलापूरी चादरी, जयपूरी दोहर, रजाई, दिवान सेट | ✗ | ✗ | ✗ | ✓ | ✗ |
| पल्लवी कव्हर्स | सोफा, फ्रीज हँडल, टॉप, मिक्सर, साडी इ.चे कव्हर्स | ✓ | ✗ | ✓ | ✓ | ✗ |
| ब्लॉक्स अ‍ॅण्ड बाटिक्स् | ब्लॉक प्रिंट/बाटिक बेडशिटस्, ड्रेस मटेरिअल, कुशन कव्हर्स | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| ऊब | हस्तकलेच्या गोधड्या बेडींग, पायपुसणे | ✓ | ✗ | ✓ | ✗ | ✓ |
| मल्हार क्रिएशन्स | बाळाचे कपडे, दुपटी, टोपी, लहान मुलांचे कपडे | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| जे.जे. एंटरप्रायझेस | लोकरीचे कपडे व स्वेटरचे विविध प्रकार | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✓ |
| अद्विका/स्माईल्स् किड्स फॅशन | लहान मुलींचे फ्रॉक्स, नाईट सूट इ. | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✗ |
| शितल बॅग्ज | विविध प्रकारच्या पर्सेस, बॅग्ज | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| विकास लेदर वर्क्स | लेदर पर्सेस, पाऊच, लेदर जॅकेट, बेल्ट इ. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| एस अ‍ॅण्ड एस बॅग्ज् | फॅन्सी बॅग्ज, पर्सेस आणि बेबी बॅग्ज | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| पुएम्स कॅरी-अ-वे | ज्युट आणि डिझायनर बॅग्ज, पर्सेस | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| उद्यमिता | महिला बचत गटांनी बनवलेल्या पर्सेस, फोल्डर्स | ✓ | ✗ | ✗ | ✓ | ✓ |
| शिवम बॅग्ज | डेनीम बॅग्ज, सॅक इ. | ✓ | ✗ | ✗ | ✓ | ✓ |
| अर्थिता बॅग्ज अ‍ॅण्ड पाऊचेस | विविध प्रकारच्या ऑर्गनायझर्स बॅग्ज | ✓ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| दिया क्विल्टस् | विविध प्रकारच्या पर्सेस, बॅग्ज, ऑर्गनायझर बॅग्ज | ✗ | ✗ | ✓ | ✓ | ✗ |
| डेकोव्हीले | विविध प्रकारच्या पर्सेस, पाऊच, वॉलेट, बॅग्ज, सॅक इ. | ✗ | ✗ | ✗ | ✓ | ✗ |
| आरतीज् बॅग्ज | पर्सेस, बॅग्ज, स्टोल्स, कंदील, फोल्डिंग पिशव्या | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✗ |
| पॅकेम् टोट बॅग्ज अ‍ॅण्ड वॉलेट | वॉलेट्स, टोट बॅग्ज, डेनिम टोट बॅग्ज | ✓ | ✗ | ✗ | ✗ | ✗ |
| भाग्यश्री लेदर बॅग्स | लेदरच्या विविध बॅग, शांतिनिकेतन बॅग | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✓ |
| उर्जा गिफ्टस् | विविध प्रकारच्या फ्रॅब्रिक बॅग्ज | ✗ | ✓ | ✓ | ✗ | ✗ |
| प्रयोग क्रिएशन | हॅण्ड पेंटेड बॅग्ज | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✓ |
| स्वप्नालंकार | इमिटेशन ज्वेलरी, सी झेड ज्वेलरी, गणपती-गौरीसाठी मोत्याचे दागिने | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| रसिका अलंकार | मायक्रो गोल्ड प्लेटेड व इतर ज्वेलरी | ✗ | ✗ | ✗ | ✓ | ✓ |
| ट्रॅडिशनल ऑर्नामेंटस् | इमिटेशन ज्वेलरी, आर्टिफिशल ज्वेलरी | ✓ | ✓ | ✗ | ✓ | ✓ |
| आर्ट इन संस्कृती | सेमी प्रेशिअस स्टोन, ग्लास बीड्स ज्वेलरी | ✓ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| श्री महालक्ष्मी आर्टस् | पारंपरिक व अ‍ॅण्टिक ज्वेलरी | ✓ | ✗ | ✗ | ✓ | ✓ |
| फॅशन क्युरा ज्वेलरी | टेरा-कोटा ज्वेलरी | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| डेकोव्हीले ज्वेलरी | सिल्वर-जर्मन ज्वेलरी | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✗ |
| शुभम डिझायनर ज्वेलरी | मोत्याचे व गोल्ड पॉलिशचे विविध दागिने, तोडे, पाटली, नेकलेस | ✗ | ✗ | ✓ | ✗ | ✗ |
| युथोपिया | गायीच्या तुपाच्या लिपस्टीक, फाऊंडेशन क्रिम | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| स्पायका होम अ‍ॅण्ड प्रॉडक्टस् | घरगुती साफसफाईची उत्पादने | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ब्लॉसम अ‍ॅण्ड इन्सेंस | परफ्यूम्स | ✗ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| मिथ परफ्यूम व अगरबत्ती | विविध प्रकारची अत्तरे, सुगंधी अगरबत्ती | ✓ | ✗ | ✗ | ✗ | ✗ |

| स्टॉलचे नाव | वैशिष्ट्ये | दादर | ठाणे | अंधेरी | वसई | बोरीवली |
|---|---|---|---|---|---|---|
| कियान कलेक्शन | हेअर बँड, क्लिप्स, लहान मुलींच्या क्लिप्स, हेअर एक्सटेंशन इ. | ✗ | ✓ | ✗ | ✓ | ✓ |
| गुजरात हँडिक्राफ्ट | बारीक मोत्यांच्या शोभिवंत वस्तू, तोरणे, चौरंग इ. | ✓ | ✗ | ✗ | ✓ | ✓ |
| विन आर्ट ॲण्ड क्राफ्ट | शोभेच्या वस्तू, तोरण, कंदिल, रांगोळी इ. | ✗ | ✗ | ✗ | ✓ | ✓ |
| रंगोली क्रिएशन्स | हस्तकलेच्या विविध शोभिवंत वस्तू, रांगोळी | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✗ |
| अखंडज्योत | टाळ, घंटी, झांज इ. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ज्ञासा ग्लास आर्टिफॅक्टस् | काचेचे दिवे, पूजा सेटस्, अत्तरदाणी इ. | ✓ | ✗ | ✓ | ✗ | ✓ |
| हरि ओम वुड वर्क्स | लाकडाच्या विविध कलात्मक वस्तू, फायबर मूर्ती | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| बियाँड फ्रेम्स | सुकलेल्या पानांफुलापासून बनवलेल्या फ्रेम्स | ✗ | ✗ | ✗ | ✓ | ✓ |
| प्रथम डेकॉर | वेगवेगळे कॅन्डल स्टॅण्डस् | ✓ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| देसाई आर्टस् | मातीच्या आकर्षक वस्तू | ✓ | ✗ | ✗ | ✗ | ✓ |
| सयाना आर्टस् ॲण्ड गिफ्टस् | तोरण (मोती, मेटल), मोत्याचे हार, रेडिमेड रांगोळ्या व इतर गिफ्टस् | ✓ | ✗ | ✓ | ✗ | ✓ |
| शिल्पनिल कलेक्शन | तांबा, पितळ मूर्ती आणि भांडी, पूजा साहित्य | ✓ | ✗ | ✓ | ✗ | ✓ |
| जान्हवी आर्टस् | फ्रिज मॅग्नेट, वॉल फ्रेम, गिफ्ट आर्टिकल | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✗ |
| कोकोनट कॉयर प्रॉडक्टस् | नारळाच्या काथ्यापासून निर्मित विविध वस्तू, कुंडी, शोभेच्या वस्तू | ✗ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| नेचर्स वूड | सावंतवाडी स्पेशल लाकडी खेळणी | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| योटॉईज | कापडी खेळणी | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |
| अनंत बुक सेलर्स | कथा, कादंबऱ्या, संत साहित्य, बाल साहित्य इ. | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✓ |
| अर्बन रूट ॲग्रो | चिंध्यांपासून बनविलेले कागद व कागदाच्या विविध वस्तू | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✓ |
| फन क्राफ्ट | मुलांसाठी विविध गेम्स | ✗ | ✗ | ✓ | ✗ | ✗ |
| शीलाताई फूड प्रॉडक्टस् | लोणचे, सरबत इ. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| कर्णिक कृषी उद्योग | गुलकंद, शेजवान सॉस | ✓ | ✓ | ✗ | ✓ | ✓ |
| मे. वेस्टर्न घाट ॲग्रो इंडस्ट्रिज | सर्व प्रकारचे मध | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| महावीर ट्रेडर्स | क्रोकरी, बनियन, मोजे इ. | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| चेतना स्टील | गृहोपयोगी स्टीलची भांडी, थर्मास् इ. | ✗ | ✓ | ✓ | ✗ | ✓ |
| श्री विनायक एंटरप्रायझेस | घरगुती सफाईचे विविध ब्रश व रांगोळ्या | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| वंश गार्डन इनोव्हेटीव्हज् | फोल्डींग चटया, फोल्डींग वेताचे पडदे | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| महालक्ष्मी एंटरप्रायझेस | किचन वेअर्स | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| विनय एंटरप्रायझेस | किचनमधील विविध आकर्षक स्टॅण्डस् होल्डर इ. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ओमकार मार्केटींग | हार्ड ॲनोडाइज्ड किचन वेअर्स | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| एस.के. एंटरप्रायझेस | फोल्डिंग टेबल्स | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| गेबी क्लिनिंग | साफ सफाईची उत्पादने | ✓ | ✗ | ✗ | ✓ | ✓ |
| माथेरान चप्पल (राजू मोरे) | पादत्राणे (माथेरान स्पेशल) | ✗ | ✗ | ✓ | ✗ | ✓ |
| माथेरान चप्पल (संतोष मोरे) | स्त्री-पुरुषांची पादत्राणे | ✗ | ✓ | ✗ | ✓ | ✗ |
| स्टेप इन वॉक शूज | विविध डीझाईन्सच्या चप्पलस्, सॅडल्स, शूज इ. | ✓ | ✗ | ✗ | ✗ | ✓ |
| जिजाबाई महिला उत्पादक बचतगट | विविध प्रकारच्या बॅग्ज, कुशन कव्हर्स इ. | ✗ | ✓ | ✗ | ✗ | ✓ |

# ASCI ॲकेडमीमध्ये मुंबई ग्राहक पंचायतीचा सहभाग

**– अनिता खानोलकर,** *कार्यवाह*

'ॲडव्हरटाईझिंग स्टँडर्ड कौन्सिल ऑफ इंडिया' (ASCI) या जाहिरातींवर स्वयंनियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या संस्थेच्या 'ASCI Academy' चा शुभारंभ २८ ऑगस्ट रोजी बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समधील जिओ कन्व्हेंन्शन सेंटर येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

'ASCI Academy' मार्फत जाहिरात क्षेत्राशी निगडीत सर्वच घटकांना मार्गदर्शक ठरतील असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरांवर उत्पादने करणाऱ्या संस्थांच्या जाहिरात धोरणाबाबत सल्ला देणे, ग्राहकांवर होणारा जाहिरातींचा परिणाम लक्षात घेऊन त्यांना जागरूक करण्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम घेणे इत्यादींचा समावेश आहे. यासाठी 'ASCI Academy' ने उत्पादक कंपन्या, शैक्षणिक संस्था आणि ग्राहक संघटना यांना एकत्रित आणून सर्वांच्या सहकार्याने या 'ASCI Academy' चे काम सुरू केले आहे. मुंबई ग्राहक पंचायत या उपक्रमामध्ये सहभागी होऊन ग्राहक प्रबोधनाच्या कार्यात ASCI ला सहकार्य करणार आहे.

श्री. रोहित कुमार सिंह, सचिव-ग्राहक व्यवहार मंत्रालय हे या कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी बोलतांना त्यांनी ASCI च्या या उपक्रमाचे कौतुक करून जाहिरात तयार करण्यापूर्वीच या क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या सर्वांना जर जाहिरातीच्या सर्व पैलूंची, त्याबाबतच्या नियमावलींची योग्य माहिती देण्यात आली तर अयोग्य संदेश अथवा इतर कारणांमुळे जाहिरात मागे घेण्याची नामुष्की टाळता येईल, असे नमूद केले.

या ॲकेडमी द्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये, जाहिरातींमध्ये सहभागी होणाऱ्या प्रभावशाली व्यक्तींना प्रमाणित (Certify) करण्याच्या उपक्रमाचा समावेश आहे. त्यामुळे त्यांना जबाबदारीने एखाद्या वस्तूची शिफारस करता येईल आणि ग्राहकांना विश्वासाने आणि संपूर्ण माहितीच्या आधारावर वस्तूंची निवड करणे शक्य होईल. हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून ASCI ची स्थापना करण्यात आली असल्याचे ASCI च्या सेक्रेटरी जनरल मनिषा कपूर यांनी सांगितले. जाहिरात तयार झाल्यानंतर त्यामधील एखाद्या अनुचित अथवा आक्षेपार्ह घटकाबाबत तक्रार आल्यास ASCI मार्फत त्या जाहिरातीचा समाजावर होणारा घातक दुष्परिणाम लक्षात घेऊन ती मागे घेण्यास उत्पादकांना सांगण्यात येते. मात्र ASCI Academy च्या स्थापनेमुळे जाहिरातीबाबत संपूर्ण मार्गदर्शन देण्यात येणार असल्याने कंपन्यांवर जाहिरात मागे घेण्याची नामुष्की ओढवणार नाही.



परिसंवादात सहभागी मुलाखतकार पी.एन.वासंती, रंजना कुमारी आणि ॲड. शिरीष देशपांडे

ASCI Academyच्या शुभारंभाच्या या कार्यक्रमामध्ये एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाचा विषय होता जाहिरातींचा समाजमनावर/ग्राहकांवर होणारा परिणाम. यावेळी बोलताना डॉ. रंजना कुमारी यांनी जाहिरातींमधील स्त्रियांचा वापर आणि वावर यांचा प्रचंड पगडा समाज मनावर असल्याने त्याबाबत खूप जास्त सतर्क आणि सजग असणे आवश्यक असल्याचे सांगितले. जाहिरात क्षेत्रातील सक्रिय अशा घटकांसाठी ॲड. शिरीष देशपांडे यांनी महत्त्वपूर्ण पुढील संदेश अत्यल्प शब्दांत दिला-

१. Innovate, don't Irritate.
२. For Influencers - Do Due Diligence (DDD)
३. Fine Print not Fine.

जाहिरात ही कायदेशीर, प्रामाणिक आणि तथ्याधारीत असावी. अनुचिती दावे, विघातक परिणाम साधणारी असू नये. उत्पादनांच्या उचित आणि निकोप स्पर्धेमधून ग्राहकांना त्यांच्यासाठी उपयुक्त वस्तूची निवड करण्याची संधी मिळावी हा जाहिरातींचा उद्देश असायला हवा असा संदेश या ASCI अकेडमीच्या शुभारंभाच्या कार्यक्रमातून उपस्थितापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न झाला असे म्हणणे उचित ठरेल. ♦

# उत्सव पंचायत पेठांचा

– अनुराधा देशपांडे

सुरू होतोय आता खरेदीचा उत्सव. गणपती विसर्जन झाले की वेध लागतात पंचायत पेठांचे. अक्षरशः अनंत चतुर्दशी झाली की लगेच दादर येथील पंचायत पेठेने सुरुवात होते. पंचायत पेठांच्या शृंखलेतील हा ३ रा टप्पा. अतिशय उत्सुकतेने भारलेला. कार्यकर्त्यांसाठी उत्साहाने सळसळणारा. गेल्या काही वर्षात पंचायत पेठेच्या ह्या उपक्रमाने चोखंदळ ग्राहकांचे मोठे मानांकन प्राप्त केले आहे. मॉल आले, ऑनलाईन खरेदीचे माहोळ उठले, तरी प्रत्यक्ष विश्वासार्ह खरेदी करण्यासाठी मुंबई ग्राहक पंचायतीच्या पेठा आपले स्थान टिकवून आहेत. बाजारपेठेत विविध ग्राहक पेठांमधून व्यावसायिक लाभ मिळवू पाहणाऱ्या अनेक ग्राहक पेठांचे आयोजक बाजारपेठेत मोठ्या हिरीरीने उतरले. आपण जिथे जिथे पंचायत पेठेचे आयोजन करतो तीच वास्तू, तोच हॉल, तोच पंचायत पेठांचा आसपासचा काळ अशा नाना युक्त्या लढवत पंचायत पेठांना स्पर्धेच्या बाजारात खेचण्याचा जोरदार प्रयत्न होतोय. स्पर्धा बाजारपेठेत नक्कीच असावी पण ती ग्राहकाला जास्तीत जास्त उचित व्यवहाराने बांधून घेण्याची. त्याचा गिऱ्हाईक करण्याची नक्कीच नाही. पण हे होत नाही. आपली भ्रष्ट नक्कल आयोजनांत करताना ग्राहकांप्रति उचित व्यवहाराचे धोरण पार खुंटीवर टांगले जाते. अशा पेठांतून योग्य पावतीचा अभाव, किंमतीची घासाघीस, बार्गेनिंग, सदोष वस्तूंबद्दलचे ग्राहकांप्रती असलेले एकतर्फी धोरण ह्या सगळ्याच अनुचित प्रथांचा अवलंब होताना दिसतो. अशा वेळी आपल्या पंचायत पेठांना का समाजमान्यता मिळते, का ग्राहक आपल्या पंचायत पेठांची वर्षभर वाट बघतात ह्या प्रश्नांचे उत्तर सापडते.

३० सप्टेंबरपासून आपली ३ ऱ्या टप्प्यातील पहिली पेठ दादरच्या सूर्यवंशी हॉलमध्ये संपन्न होत आहे. ३० सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर  ह्या कालावधीत संपन्न होणाऱ्या दादरच्या ह्या पंचायत पेठेत नाविन्यपूर्ण वस्तूंनी भरलेले अनेक स्टॉल आहेत. शिवाय संस्थेचा वितरणाचा स्टॉल, जागो ग्राहक जागोचा स्टॉल असणार आहे. (अर्थात हे सर्व स्टॉल आपल्या सर्वच पेठांत असतील) खास आकर्षण म्हणून बाबा आमटेंच्या 'आनंदवन' स्टॉलचे पुनरागमन दादर येथील सूर्यवंशी हॉलमध्ये होतंय. दादरनंतर क्रमशः ठाणे, अंधेरी, वसई, बोरीवली येथे पंचायत पेठा संपन्न होतील.

ह्यावर्षी आपण अंधेरी येथील पेठेला जोडून 'सेतू बांधा रे!' ह्या शिर्षकाखालील विशेष पेठेचे आयोजन करत आहोत. समाजातील वंचित घटकांना घेऊन ते निर्मिती करत असलेल्या वैविध्यपूर्ण उत्पादनांनी सजलेली ही पेठ असेल (ह्या संदर्भातील सविस्तर माहिती ह्याच अंकात इतरत्र दिली आहे.)

पंचायत पेठांचा हा माहोल केवळ अभूतपूर्व. संस्थेचे असंख्य कार्यकर्ते ह्या पंचायत पेठांसाठी स्वयंस्फूर्तीने कार्यरत असतात. किंबहुना पेठेत काम करायला मिळणे ही त्यांच्यासाठी आनंददायी उत्साहपर्वणी असते. आणि हे सर्व काम कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न बाळगता स्वयंसेवी पध्दतीने होते. संस्थेचे हे कार्यकर्त्यांचे वैभव खऱ्या अर्थाने जगभर आश्चर्याने चर्चिले जाते. इथे येणाऱ्या व्यावसायिक विक्रेत्यांनाही संस्थेच्या ह्या पंचायत पेठा म्हणजे कौटुंबिक उत्साह पर्वणीसारख्या असतात. इथे विक्रेतेही आनंदी आणि खरेदी करणारा चोखंदळ ग्राहकही आपला गिऱ्हाईक झालेला नाही ह्या अनुभवाने आनंदी,  अशी ही पर्वणी. अशा ह्या आनंदोत्सवात आपण सगळेच सहभागी होणार आहोत. दसरा ते दिवाळी आणि पुढे सुरू होणारी लग्नसराईची खरेदी आपल्याच पंचायत पेठेतून करणार आहोत. इथे नाही फ्री, फुकटचा भूलभूलैय्या! प्रत्येक ग्राहकाला पावती देण्याचे बंधन, सदोष वस्तूंबद्दलचे ग्राहकाभिमुख धोरण! दर्जेदार रास्त किंमतीतली नाविन्यपूर्ण उत्पादने खरेदी करायला प्रत्यक्ष या, बघा, स्पर्श करा, अनुभवा ह्यासाठी पंचायत पेठ समितीतर्फे आग्रहाचे निमंत्रण आणि मनःपूर्वक शुभेच्छा.

♦



चेंबूर पेठेत रंगलेली संवादसंध्या आणि उत्साही कार्यकर्ते

# चोळी ते ब्लाउज-नवा लूक!

– शोभा नाखरे



**हा पंचायत पेठ विशेषांक. आपल्या पंचायत पेठेत स्टॉलचे वैविध्य खूपच असते. त्यातही एखादे खास उत्पादन वैशिष्ट्यपूर्ण ठरते. मग त्याच उत्पादनाला अनुलक्षून ह्या विशेषांकात थोडी रोचक रंजक माहिती देण्याचा आपला प्रयत्न असतो.**

**मॅचिंग किंवा क्रॉस मॅचिंगची आवड असणारे ब्लाउज घालण्याची आवड स्त्रियांच्यात वाढत आहे. मार्केटच्या दरापेक्षा खूपच वाजवी आणि वैविध्यपूर्ण ब्लाउजचे अनेक स्टॉल यंदाही पंचायत पेठेत असतील. त्याबद्दल थोडे कुतूहल चाळवणारे, भारतीय संस्कृतीतील पारंपरिक चोळी ते अनेक प्रकारचे रेडीमेड ब्लाउज हा प्रवास सांस्कृतिक व साहित्यिक अंगाने मांडणारे हे दोन सुंदर ललित लेख.**

**स**जलेल्या महिलांनी तुडुंब भरलेले प्रेक्षागृह! मागची जागा मिळाल्याने अचानक एक अकल्पित सत्य नजरेसमोर आले. प्रत्येक महिलेचा ब्लाउज हा आगळाच नमुना होता. आकार, रंग, नक्षीकाम, कलाकुसर यांत असलेले वैविध्य नजरेला मोहून गेले.

स्त्री देहाचे संरक्षण, लज्जारक्षण, सौंदर्यवर्धन, प्रतिष्ठाप्रदर्शन, पुरुषांना आकृष्ट करणे यासम विविध प्रेरणा; वस्त्र परिधानामागे असतात. आदिम स्त्री–पुरुष जादूटोणा, भूतपिशाच्चापासून रक्षणासाठी रंगकाम, गोंदवणे, कवड्या तसेच जनावरांची कातडी, झाडांच्या साली, पाने यांचाही उपयोग करीत. सीतेची, शकुंतलेची वल्कले तर सर्वश्रुतच आहेत. एकोणिसाव्या शतकात नऊवारी लुगडे, कोपरापर्यंत बाह्यांची व्ही अक्षराच्या गळ्याची, मध्यावर गाठ मारलेली खणाची चोळी, विशेष प्रसंगी जरीच्या खणाची चोळी आणि वर भरजरी शेला घेण्याची प्रथा होती. काही स्त्रिया जास्त उंच चोळी घालायच्या, कोपराहूनही लांब बाह्या असायच्या.

विवाहासम शुभकार्यात रेशमी साड्या, पैठणी परिधान करायची पध्दत आजही आहे. बदल झालाय तो फक्त ब्लाउजमध्ये...!

आपल्या लोकगीतातील चोळीगीताचे दाखले साहित्यिका शांताबाई शेळके यांनी ‘अशीही चोळीगीते’ या ललित लेखात दिले आहेत,

**अगं यश्वदे, तुझा सावळा कुठेच हा नसतो**
**पाण्या जाता यमुनेतीरी वाटेवर बसतो**

कृष्णगोपीचा नर्मविनोदात्मक शृंगार व्यक्त करणाऱ्या या ओळी. शांताबाई पुढे चोळ्यांचे प्रकार सांगतात– राजस्थानी पध्दतीची बिनपाठीची काचोळी, कोपरापासून कितीतरी पुढे येणारी, खूप लांब बाहयांची माळणीची चोळी, पुढच्या पाख्यांची, फक्त उरावर एक गाठ दिली जाणारी चोळी, गळ्याशी गुंडी आणि खाली बटणे असणारी नंतरची फॅशनेबल चोळी! यातील गाठ असलेली चोळी आगळीवेगळी! यातल्या कळ्यांमुळे त्याच्या बाह्या अंगाला सुरेख बसतात. ही नऊ तुकड्यांची पारंपरिक, बेतशीर बसणारी, सुखावह चोळी!

संत एकनाथ यांनी आदिमायेचे म्हणजे जगज्जननीचे सुंदर स्तोत्र लिहिले आहे, त्यामध्ये नवखंड पृथ्वी म्हणजे आदिमायेची नऊ तुकड्यांची चोळी असे वर्णन केले आहे–

**‘नवखंड पृथ्वी तुझी चोळी,**
**पाउले गेली सप्तपाताळी**
**एकवीस स्वर्ग मुकुटी झळाळी**
**दार उघड बया, दार उघड!**

कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी लिहिलेले आदिमाया दुर्गेचे वर्णन, या कवनात आदिमायेला त्या सहज 'येडिमाय' करून टाकतात.

**बारा गाडे काजळकुंकू, पुरलं नाही लेनं**
**साती सामिंद्रांचं पानी, झालं नाही न्हानं**
**धरतीवरलं चांदी, सोनं, दागिन्यांची लूट**
**आभायाचं चोयी लुगडं, ते बी झालं थिटं**
**(आभाळाचं चोळी-लुगडं)**

छत्रपती शिवराय दक्षिण दिग्विजय करून कर्नाटकात बेलवडी गावातली देसाईगढीशी येतात. ही गढी मावळ्यांना जिंकायची होती. लढाई सुरू झाली, तब्बल महिना उलटला तरी गढी हाती येईना. सावित्री देसाई नावाची महिला गढीसाठी चिवट झुंज देत होती. पुढे तिला कैद झाल्यावर भेदरलेल्या तिने आपल्या बाळाला न मारण्याची याचना महाराजांकडे केली. तेव्हा शत्रूच्या बाईसाठी शिवरायांच्या मुखातून शब्द आले, ताई, तुम्हाला ताई म्हटले, म्हणजे हे बाळ माझा भाचा झाला. आज प्रथमच भेटतोय याला. ताई, या बाळाच्या दूध, भातासाठी मी ही जिंकलेली गढी त्याला देतोय...आणि आजूबाजूचा प्रदेश तुला चोळी बांगडीसाठी'' ...असे म्हणून राजांनी सन्मानाने तिला गादीवर बसवून तिचा सन्मान केला. पुढे शिवरायांचे शिल्प या बहिणीने उभारले. गादीवर महाराज, मांडीवर बाळ, नि हातात चमचा वाटी, त्याने ते बाळाला दूध पाजत आहेत. आजही ते शिल्प कर्नाटकातील बेलवडी गावात पहायला मिळते. चोळी-बांगडी म्हणून छत्रपती शिवाजीमहाराज प्रांत-प्रदेश देत असत. चोळी-बांगडीचा इतका महान अर्थ आणखी कशाला शोधावा?

चोळीची खाली मारलेली गाठ, अनाहत चक्रावर दाब देते. पंचप्राणातून, अनाहत चक्राद्वारे सात्विक भावांच्या लहरी शरीरात सातत्याने उचंबळून येतात.

तर 'पळसखेडची गाणी' - मध्ये ना.धो. महानोर लिहितात-

**भ्रताराचं सुख तळहाताची सावली**
**नाही आठू दिली परदेशीची माउली**
**लग्नाचा देव कसा करणीचा राजा**
**चोळी लुगड्याचा छंद पुरविला माझा.**

- ना. धो. महानोर

'वडीलधारी माणसे' या लेखसंग्रहात आपल्या आईचं म्हणजेच जिला त्या 'वहिनी' म्हणत, ते व्यक्तिचित्र रेखाटताना शांताबाई शेळके लिहितात, वहिनी आपल्या चोळ्या आपणच शिवायची, चोळीचे नऊ तुकडे कापून लाग, कळ्या, पाखे ती भराभर शिवते आहे आणि मी जवळ बसून तिची नाजूक, रेखीव, दाणेदार टीप कौतुकाने विस्फारलेल्या डोळ्यांनी बघत आहे, असे बालपणीचे कितीतरी प्रसंग मला आठवतात.''



कवी अनिल यांनी पावसाच्या एका कवितेत 'रानराणीचा शृंगार' वर्णन करताना म्हटले आहे,

**पावसा पावसा लप ढगात**
**सागर फुलांची कशिदा खडीची**
**घालू दे तंगशी चोळी अंगात**
**तर अशाच संदर्भात ना. धो. महानोर लिहितात-**
**लख्ख डहाळी, हिरवी चोळी**
**हिरव्या लुगडयाला जरतार**
**हिरवे-हिरवे चुडे चहाटळ**
**अटळ-अटळ श्वासांचा भार**

उपेक्षितांच्या वाट्याला हिरवळीचे दिवस येऊ दे, ही मागणी, अभावग्रस्त समाजाला आशेचा किरण दाखवणारी आहे. संत परंपरेशी नातं जोडत कवयित्री सावित्री जगदाळे 'पाऊस' कवितेत म्हणतात,

**पाऊस हळवा, भरलेली झोळी**
**दे लुगडं चोळी, धरणीला!**

'सावळ्या रे' संग्रहात अनघा दिघे 'निळ्या संध्याकाळी' कवितेत राधेबद्दल लिहून जातात-

**'झळाळणारं वस्त्र, किनखापी चोळी**
**चमकते पैंजण, चांदण्यांच्या ओळी'**
**तर 'अंतःस्वर' मध्ये रमा नामजोशी म्हणतात-**
**'माझी घामेजली चोळी, थरथरतो रे ऊर**
**अलवार ओठांनी तू, घाल -घाल रे फुंकर!'**

'चोळी' शब्दाचेच आणखी एक रूप म्हणजे काचोळी. संस्कृतमधील 'कंचुलिका' पासून बदल होत आलेला शब्द! चोळीचा संदर्भ असलेले अभंगही आहेत.

**वेणी फुलाची जाई जुईची वर मोत्याची माळ**
**साडी जरीची चोळी बुट्ट्याची नेसुनी चंद्रावर**

**एका जनार्दनी पूर्ण कृपेने, भक्ती माझी भोळी!**

**जनाबाईंच्या अभंगातही 'हाती घेउनिया लोणी।'**
**डोई चोळी चक्रपाणी।'**

असा उल्लेख येतो. एकनाथांनी देखील भारुडात 'फाटकेच लुगडे, तुटकीसी चोळी तिला शिवाया दोराच नाही' असे म्हटले आहे.

साडी-चोळी हा पोशाख घेतला तरी अनेक चित्रपटगीतं मनात फेर धरू लागतात. 'चंदनाची चोळी माझं अंग अंग जाळी', 'दे रे कान्हा दे रे चोळी अन लुगडी'. 'फाटला गं कोना माझ्या चोळीचा!' 'हम आपके है कौन'मधील 'दीदी तेरा देवर दिवाना' गीतातील माधुरी दिक्षितचा पाठीचे दर्शन घडवणारा नक्षीदार ब्लाउज तर विसरताच येणार नाही.

आजही 'गुड्डी' चित्रपट म्हटला की त्या चित्रपटातील फुग्याच्या हाताचा ब्लाउज घातलेली जया भादुरी पटकन डोळ्यासमोर येते. सध्या लांब बाह्याचे, बिनबाह्याचे, फुगीर हाताचे, बंद गळ्याचे, दंडावर उघडे असे नानाविध रूपाचे शिवून घेतलेले वा तयार मॅचिंग ब्लाउज वापरले जातात. साडीच्या रंगानुसार तीच छटा असलेला ब्लाउजपीस शोधणं, पुढे तो शिंप्याकडे शिवायला देणं, त्यावर योग्य कलाकुसर करणं; हा सारा वेळखाऊ, सहनशीलतेची कसोटी जोखणारा मामला! याचमुळे तयार ब्लाउज त्यात छोटासा फेरफार करणे, सोयीचे आणि बिनात्रासाचे झाले. सध्या तयार ब्लाउजची प्रचंड मोठी बाजारपेठ निर्माण झाली आहे. मुंबई ग्राहक पंचायत पेठांतही याचे प्रत्यंतर येते. आपल्या पेठांत ब्लाउजचे स्टॉल गर्दी खेचतात. अनेक प्रकारचे तयार ब्लाउज महिलांना आकर्षित करतात. बाटिक, बांधणी, ब्रोकेड, खण, जयपूर प्रिंट, इकत, कलमकारी अशा अनेक कपडांचे ब्लाउज मिळतात. त्यावर भरतकाम, नक्षीकामही असते. आजच्या मुली अगदी संगणक तज्ज्ञ असोत वा सैनिकी पेशात असोत, कोणत्याही व्यवसायात असल्या तरी पारंपरिकपणे नटण्या-मुरडण्याची हौस तशीच असते; कारण विवाहासम सोहळा एकदाच मजेत आनंदात पार पाडायचा असतो. त्यासाठी--

**पदरावरती जरतारीचा मोर नाचरा हवा**
**आई मला नेसव शालू नवा!... हेच खरे!**

आणि मग पदरावरती जरतारी मोर असेल तर ब्लाऊजवर भरलेला नथनीचा नखरा हवा, हो ना !

♦

# ब्लाऊज आणि टॅकटॉप!

**– पल्लवी वर्तक (सदाफुली)**



कंचुकी, चोळी, पोलका अशा विविध नावांनी भारतीयांना माहित असलेला हा पोशाख 'ब्लाऊज'वर कधी येऊन थांबला, हे कळलेच नाही. फ्रेंच शब्दावरून आलेला हा शब्द, प्रथम १८७० मध्ये 'महिलांसाठी' असा उल्लेखला गेला. अनेक ग्रंथ, पौराणिक लिखाण आणि कोरीव काम असलेले पुरातन अवशेष यातून ब्लाऊजचा इतिहास समजतो!

१९२० च्या दशकात ज्ञानदानंदिनी देवी यांनी ब्लाऊज जॅकेट आणि साडी या पहरावाला लोकप्रिय केले. आणि मग सुरू झाला या पहरावाचा प्रवास!

साडी-चोळी म्हटले की खणाची चोळी आणि इरकलीची साडी डोळ्यासमोर येते. या चोळीचे प्रकार जसजसे बदलत गेले, तसतशी एक नवीन फॅशन येत गेली. कटोरी, प्रिन्सेस कटपासून पॅडेड ब्लाऊज, शिवाय लांब हाताचे, स्लिवलेस, मेगास्लिवज असे नानाविविध प्रकार आणि तितक्याच नवनवीन डिजाईनस. कधी Contrast Blouse ची फॅशन, तर कधी मोनोक्रोम (Monochrome) बॅकलेस, क्लोज बॅक, हॉलटर नेक (halter neck) ही आधुनिक रूपे. मशीन वर्क, हॅन्डवर्क, हॅन्डपेंट, पॅचवर्क असे डिझाईन ब्लाऊजच्या वेगळेपणात हातभार लावतात.

साडीची खरी शोभा तर त्यावर शिवलेला ब्लाऊज कसा आहे यावर ठरते. 'चार आण्याची कोंबडी आणि बारा (१२) आण्याचा मसाला' अशी गत साडीवरच्या ब्लाऊज बाबत नेहमीच होते.

जो ब्लाऊज आपण साडीवर दिमाखात मिरवतो, तोच आजची पिढी पँटवर टॅकटॉप म्हणूनही जिरवते! कुंचुकी, चोळी, पोलका ब्लाऊज ते टॅकटॉप हा आहे एक गमतीशीर प्रवास! ♦

# ‘One Station One Product’ उपक्रम बोरिवलीत संपन्न

– सुमिता चितळे

भारत सरकारच्या One Station One Product या योजनेअंतर्गत मुंबई ग्राहक पंचायतीला पहिला स्टॉल जून महिन्यात पश्चिम रेल्वेच्या अंधेरी स्टेशनवर मिळाला होता. तेथील स्टॉलला चांगला प्रतिसाद मिळाल्यावर बोरिवली स्टेशनवरही पूर्व बाजूला आपल्या संस्थेला १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२३ या कालावधीत हा स्टॉल मिळाला. १ सप्टेंबरला सकाळी बोरिवली विभागाच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी संत आणि बोरिवली स्टेशनचे रेल्वे अधिकारी अशोक मिश्रा यांच्या हस्ते या स्टॉलचे उद्घाटन झाले. त्यावेळी विभागाचे कार्याध्यक्ष राजेंद्र राणे, कार्यवाह सविता वराडे, सहकार्यवाह पंकज कुलकर्णी आणि बोरिवली व दहिसरचे कार्यकर्ते उपस्थित होते.

गणेशोत्सवापूर्वी हा स्टॉल असल्यामुळे या स्टॉलवर गणपतीसाठी पर्यावरणस्नेही, वेगवेगळ्या डिझाईनचे, आकाराचे आणि फोल्ड करून ठेवता येण्याजोगे मखर विक्रीस ठेवण्यात आले होते. याचबरोबर पूजा साहित्य बॉक्स, सुकामेवा पंचखाद्य व कापडी पिशव्या, रवा, पोहे आणि संस्थेची इतर उत्पादनेही विक्रीस ठेवली होती. ही मखरे इतकी आकर्षक होती की, येणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत होती. काही जण आवर्जून चौकशी करत होते. संस्थेची माहिती विचारत होते, सभासद होण्यासाठी काय करावे लागेल हे जाणून घेत होते. काही जण लगेच आपल्या संस्थेचे सहयोगी सभासदसुध्दा झाले. ही माहिती घेताना त्यांनी कार्यकर्त्यांबद्दल विचारले, तेव्हा संस्थेचे सर्व कार्यकर्ते स्वेच्छेने विनामोबदला काम करतात हे ऐकून तर त्यांना अतीव आश्चर्य वाटले. त्यांनी परत परत विचारले की, तुम्ही सर्व असे कसे काम करता. पण हीच तर कार्यकर्त्यांची आपल्या संस्थेबद्दलची ओढ आणि खासियत आहे!

या स्टॉलवर सकाळी दहिसरचे कार्यकर्ते यायचे तर दुपारी ३ वाजल्यापासून बोरिवलीचे कार्यकर्ते हा स्टॉल सांभाळायचे. छायाताई वारंगेसुध्दा या स्टॉलवर दहिसरच्या कार्यकर्त्यांबरोबर त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बसल्या होत्या. पुरुष मंडळींनी संध्याकाळी हा स्टॉल नेमाने सांभाळला.

अनेक जणांनी या स्टॉलला भेट दिल्यामुळे संस्थेची सर्वांना माहिती होण्याचा आपला हेतू थोड्या प्रमाणात तरी साध्य झाला. याबरोबरच गणपतीची मूर्ती आणि आरास वा



OSOP च्या ह्या स्टॉलवरील पर्यावरणप्रिय कागदी मखर ग्राहकांचे लक्ष वेधून घेत होती

सजावट पर्यावरणपूरक असावी किंवा मखर आणले तर तेही थर्माकोलचे न आणता पर्यावरणस्नेही का असावे याचीही लोकांना माहिती दिली. शिवाय माव्याचे पदार्थ कमी करून पंचखाद्य किंवा तत्सम पदार्थ का खरेदी करावेत हेही लोकांना सांगत होतो. ज्यांना मुंबई ग्राहक पंचायत माहित आहे, पण जे आता सभासद नाहीत ते इथे अजून काही जिन्नस आहेत का, पेठ कधी आहे याचीही विचारणा करीत होते.

अशा प्रकारे १५ दिवस असलेल्या या स्टॉलमधून उत्पादनांची विक्री तर झालीच; शिवाय आपली संस्था ग्राहकांपर्यंत पोचवण्याबरोबरच ग्राहक जागृतीसुध्दा सर्व कार्यकर्ते करत होते. बोरिवली आणि दहिसर या दोन्ही विभागाच्या कार्यकर्त्यांच्या परस्पर सहकार्यातून ‘‘One Station One Product’’ हा भारत सरकारचा मुंबई ग्राहक पंचायतीसाठी दिलेला उपक्रम सफल झाला. ♦

# Scrap the requirement of Registrar's nominee for selection of Developer for Re-development

**- Shirish Deshpande,** *Chairman – MGP*

In a letter addressed to the Chief Minister and the Deputy Chief Ministers, we (MGP) have urged the government to scrap the condition of presence of authorised representative of the Registrar of Cooperative Societies in the General Body meetings of the Societies where selection of the Developer for re-development project takes place.

The guidelines issued by the Maharashtra government under section 79 A of the MCS Act vide GR dated 3rd January 2009 and revised GR dated 4th July 2019 make it mandatory for every housing Society going for re-development to select the developer in the transparent manner and for that purpose it is mandatory for the society to ensure the presence of the authorised representative to be deputed from the Office of the Registrar of Co-op. Societies.

We have pointed out that this process is being grossly abused by the Office of Registrar and a huge amount is being demanded from the societies/ developers to issue the so-called No Objection Certificate confirming compliance of these guidelines. We have also revealed that for deputing the representative of the Registrar and subsequently issuing the compliance/ NOC, the prevailing rate is between Rs. 25,000 to Rs. 30,000 per flat. In the case of MHADA societies, the rate is Rs. 20,000 per flat.

Since this amount is demanded for deputing the authorised representative from the Registrar's Office, the societies find it difficult to raise such a huge amount in cash. Hence the societies are advised by the Registrar's Office to hold the so-called internal General Body Meeting wherein the society is asked to select a "preferred developer". Once the preferred developer is selected, the society gives him a letter to that effect, and then that "preferred developer" obliges with the illegal demand from the Registrar's Office. Thereafter the Registrar nominates his authorised representative to attend the true General Body and then the said "preferred developer" is once again selected formally with video shooting etc. in the presence of the Registrar's nominee.

We have raised a strong objection to this rampant corruption which has become a system and hence called upon the CM and the deputy CMs to forthwith do away with this requirement of the presence of Registrar's nominee at the General Body Meeting scheduled to select a developer for re-development. We have suggested that the requirement of video shooting for such General Body Meetings should and must continue and the record of the same may be retained by the societies if any dispute or irregularity occurs in the selection of a developer. We have also pointed out that doing away with the mandatory requirement of the Registrar's nominee will reduce the process time of re-development by at least 2 to 3 months besides eradicating such rampant corrupt practice. ♦

# ASCI ॲकेडमीचे उद्घाटन




ग्राहक व्यवहार मंत्रालय सचिव श्री. रोहित कुमार, 'आस्की'चे सचिव श्रीमती मनिषा कपूर आणि संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे आणि संस्थेचे कार्यकर्ते

# 'One Station One Product' उपक्रम बोरिवलीत संपन्न




*बोरीवली विभाग अध्यक्ष मा. सुहासिनी संत, कार्याध्यक्ष राजेंद्र राणे आणि बोरीवली, दहिसर विभाग कार्यकर्ते*

• Postal registration No. MCN/158/2023-2025 • WPP License No. MR/TECH/WPP-137/North/2023-2025
• License to post without prepayment, on 5th & 6th • Vile Parle (W) P.O. Mumbai 400 056
RNI No. MAHBIL/2011/39044



# सेतू बांधा रे

सिंफनी बँक्वेट, सहार रोड, अंधेरी (पू.)
२०/२१/२२ ऑक्टोबर २०२३











